**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**(दिनांक 10.05.2018 ची मनपा सर्वसाधारण सभा)**

**बुधवार**, दि. 16.05.2018 रोजी सकाळी 11.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| पाटील विनय विश्वांबर | राऊत दिपक नरहरी |
| पाटील सुनंदा सुभाष | कल्याणकर ज्योती किशन |
| कल्याणकर बालाजी देवीदास | कदम ज्योती मनिष |
| तुप्पेकर संगीता सखाराम | मुळे कविता संतोष |
| देशमुख सतीश पुंडलीकराव | पवळे उमेश देवराव |
| पूरी कौशल्या शंकर | कोकाटे करुणा भीमराव |
| गाडीवाले संदिपसिंघ शंकरसिंघ | वाघमारे दयानंद नामदेव |
| बिरकले सरिता बालाजीराव | चव्हाण आनंद शंकरराव |
| पावडे जयश्री निलेश | नेरलकर अपर्णा ऋषीकेश |
| खान फारुख अली इलीयाज खान | यन्नम राजेश लक्ष्मीनारायण |
| देशमुख वैशाली मिलींद | रायबोले ज्योती सुभाष |
| चव्हाण उमेशसिंघ अशोकसिंग | पाटील संगीता विठ्ठल |
| खान अब्दुल अलीम खान अब्दुल जलील खान | येवनकर मोहिनी विजय |
| खान सलीमा बेगम नुरुल्ला खान | गड्डम नागनाथ दत्तात्रय |
| स्वामी किशोर मल्लीकार्जून | गाडीवाले मनमितकौर नरेंद्रसिंघ |
| तिडके प्रशांत विठ्ठल | गजभारे बापुराव नागोराव |
| शहाणे अल्का जगदीश | पवार जयश्री परमेश्वर |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | आसीया बेगम अब्दुल हबीब |
| रझीया बेगम बाबु खान | खान म.मसुद अहेमद खान उस्मान खान |
| अब्दुल सत्तार अ. गफुर | शमीम बेगम शेख जावीद |
| अरशीया कौसर मोहम्मद हबीब | अ. रशिद अ. गणी |
| सोनकांबळे गंगाबाई मल्हारी | कुरेशी रेहाना बेगम चाँद पाशा |
| अब्दुल शमीम अब्दुल्ला साब | मोहम्मद साबेर चाउस मोहम्मद नासेर चाउस |
| अ. लतीफ अ. मजीद | फरहत सुलताना खुर्शीद अन्वर |
| कोकुलवार नागेश गोविंद | कापुरे गितांजली रामदास |
| अ. हफीज अ. करीम | फारुख हुसेन कासीम पिरान |
| रावत दिपकसिंग काशिनाथसिंग | सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ |
| खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ | रावत भानुसिंग गयादिनसिंग |
| तेहरा अमीतसिंग गोपालसिंग | मुथा कांताबाई प्रकाशचंद |
| धबाले दिक्षा कपिल | शोएब आफाख स. मजहर हुसेन |
| गोडबोले ज्योत्सना राजु | अ. फयीम अ. मुनीर |
| गायकवाड चित्रा सिध्दार्थ | मोरे दिपाली संतोष |
| गोरे शांता संभाजी | काळे राजु गोविंदराव |
| गुपिले बेबी जनार्धन | जाधव श्रीनिवास नारायणराव |
| देशमुख मंगला गजानन | घोंगरे इंदुबाई शिवाजी |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर हे होते तसेच मा. श्री लहुराज माळी आयुक्त, श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, श्री कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्री रत्नाकर वाघमारे उपआयुक्त (प्रशासन/विकास), श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियता (साबांवि). श्री सुग्रीव अंधारे कार्यकारी अभियंता पापुजनि, श्री माधव बाशेट्टी शहर अभियंता व महानगरपालिकेतील सर्व क्षेत्रीय कार्यालयातील सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात येते.

वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**दिपकसिंह रावत** आपल्या महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त यांचे ह्दयविकारांने त्यांचे निधन झाले आहे. सर्व सभागृहाला विनंती करतो की त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी तसेच मृत्यू पावलेल्याच्या वारसास नौकरीवर घेण्यात यावे व हा ठराव या सभेत कायम करण्यात यावा.

**आनंद चव्हाण** दिपकसिंह रावत यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** मनपाकेचे सहाय्यक आयुक्त श्री एल.के. चवहरे यांचे –ह्दय विकाराच्या झटक्याने दुखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यास मान्यता देण्यात येत

**ठराव क्रं. 36** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील अधिकारी श्री एल. के. चवरे सहाय्यक आयुक्त (आस्थापना/साप्रवि) यांचे –ह्दय विकाराच्या झटयाने दुखद निधन झाले असल्याने त्यांना हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते श्रध्दांजली अर्पण करते.

**अ. शमीम अब्दुला** मनपाचे फायर ऑफीसर श्री रईस पाशा यांचा सत्कार परभणीचे जिल्हाधिकारी यांनी केला त्याबददल त्यांचे या सभागृहात अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवण्यात येतो. महानगरपालिकेचा त्यांच्या या कामगीरीमुळे सन्मान झालेला आहे. त्यांना पुढील काम चांगले करण्याबाबत त्यांना संपुर्ण सभागृहाच्या वतीने शुभेच्छा.

**आनंद चव्हाण** नांदेडच नांव परभणी, लातुर व उस्मानाबाद  या जिल्हयात जावून उचांवल त्याबददल त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

**महापौर** मनपाकेचे अग्नीशन अधिकारी श्री शेख रईस पाशा यांना पभरणीचे जिल्हाधिकारी व मा ना. पालकमंत्री महोदयांनी सुध्दा त्यांनी मागील पावसाळयात चांगला काम केल्यामुळे त्यांचे अभिनंदन केलेले आहे आहे त्यामुळे श्री शेख रईस पाशा यांचे अभिनंदन करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 37** **ठराव**

श्री शेख रईस पाशा, अग्निशमन अधिकारी यांनी परभणी जिल्हयात मागील वर्षी मुसळधार पावसात नागरीकांचे जिव वाचविल्यामुळे संबंधीत अग्निशमन अधिकारी यांना मा. जिल्हाधिकारी परभणी व मा. पालकमंत्री महोदय यांच्या हस्ते दिनांक 01 मे 2018 रोजी सन्माननीत करण्यात आले असुन त्यांचे हार्दीक अभिनंदन हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते करते.

**किशोर स्वामी** आपल्या नांदेड शहरामध्ये तिव्र पाणी टंचाई आहे त्यावर उपाय म्हणुन राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण साहेब, मा. जिल्हाधिकारी व मा. महापौर आणि तत्कालीन आयुक्त यांच्या परीश्रमाने दुधना बॅरेजमधुन पाणी आणण्यासाठी प्रयत्न केले त्याबददल त्यांचे या सभागृहात अभिनंदन करतो.

**महापौर** नांदेड शहरासाठी नागरीकांना पिण्याचे पाण्याचे पाणी दिग्रसन येथुन आणण्यासाठी मा. खा. श्री अशोकराव चव्हाण, मा. जिल्हाधिकारी मा. महापौर यांच्या प्रयत्नामुळे पाणी विष्णपूरी धरणात आणल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 38** **ठराव**

नांदेड शहरासाठी नागरीकांना पिण्याचे पाण्याचा प्रश्न गंभील झाल्यामुळे शहरवाशींना पिण्याचे पाणी दिग्रस या ठिकाणाहुन मा. खा. श्री अशोकरावजी चव्हाण, मा. जिल्हाधिकारी नांदेड, मा. महापौर यांच्या प्रयत्नाने पाणी विष्णुपूरी धरणात पाणी आणल्यामुळे हया सर्वांची हार्दिक अभिनंदन हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते करते.

**आनंद चव्हाण** आपल्या मनपाच्या वैदयकीय अधिकारी असलेल्या डॉ. सविता चव्हाण यांचा मुलगा आयएएसची परीक्षा पास केली त्याबददल त्यांचे व नांदेड जिल्हयातुन एकुण 5 आयएएस झालेले आहेत त्यांचे या ठिकाणी मी अभिनंदन करतो. स्पर्धा परीक्षेसाठी त्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

**महापौर** मनपाकेतील कार्यरत असलेल्या डॉ. सौ सविता चाव्हाण वैद्यकिय अधिकारी यांच्या मुलाने महाराष्ट्र शासनाच्या एमपिएससी परिक्षेत उत्तीर्ण झाल्या बद्दल त्यांचे अभिनंदन करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 39** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कार्यरत असलेल्या सौ. सविता चौहाण वैद्यकिय अधिकारी यांचा मुलाने महाराष्ट्र शासनाच्या MPSC परिक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचे हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते हार्दिक अभिनंदन करते.

**दिपकसिंह रावत** कर्नाटक राज्यामध्ये सर्वात जास्त जागा या भाजपाला मिळाल्या आहेत त्याबददल मी अभिनंदनाचा प्रस्ताव या ठिकाणी मांडत आहे.

**वैशाली देशमुख** कर्नाटक राज्यात सर्वात जास्त जागा भाजपाला मिळाले असल्याने त्या अभिनंदनाच्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**सभागृह नेता** जागा कशा आल्या आहेत हे सर्वांना माहित आहे. पण जेडीयु व काँग्रेस या पक्षाने युती करुन मुख्यमंत्री करण्यास यश मिळविले हे लोकशाहीचा विजय आहे. त्याबददल मि अभिनंदन करतो. मा. आयुक्त साहेब ही आपली पहीलीच सभा आहे. या सभेमध्ये आपले या ठिकाणी मी अभिनंदन करतो. मागील आयुक्त हे एक वर्ष होते त्यांच्या काळात काही कामे मार्गी लागली आहेत त्याच पध्दतीने आपण देखील काम कराल अशी अपेक्षा आहे. आम्हाला आपल्या रुपाने आयएएस मिळाला आमच ते भाग्य आहे. आम्ही आयएएस अधिकारी मागुन घेतो. आपण जे प्रकल्प हाती घेणार ते पुर्ण करावे अशी अपेक्षा करतो आणि आपले नांदेड नगरीत स्वागत करतो.

**अ.शमीम अब्दुला** आपण नांदेड मनपात रुजू झालात. शहरात जे प्रकल्प आहेत ते पुर्ण करावे. आपले शहरात स्वागत आहे. आपण चांगले काम कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**दिपकसिंह रावत** नांदेड शहरात आपले स्वागत आहे. मागील आयुक्तांनी नगरसेवक स्वेच्छा निधीचे 10 लक्षाची कामे करणार असे सांगीतले होते आपण ही रु 10 लक्षाची कामे तात्काळ सुरु करावी. महापौरांनी मागील सभेत रुलींग दिलेली आहे त्या नुसार कामे करावे अशी मी आपणास विनंती करतो.

**सोडी गुरप्रीतकौर** भाजपाच्या वतीने आपले नांदेड नगरीत स्वागत करते. आपण शहरात विकासाची कामे कराल अशी अपेक्षा करते.

**बालाजी कल्याणकर** शहरात दोन दिवस आड पाणी देण्यात येत आहे. पण पाणी नियोजनानुसार लोकांना मिळत नाही यासाठी आपण काय नियोजन केले हे सांगावे. पाणी आणण्याचे श्रेय हे मा. पालकमंत्री महोदय व आमदार हेमंत पाटील यांना जाते दुसरे कोणालाही जात नाही.

**फारुख अली खान** नांदेड शहरात आयुक्त महोदयांचे स्वागत आहे. नगरसेवक स्वेच्छा निधीचे 10 लक्षाची कामे काढावे. आता नगरसेविकेने सांगीतले की निधी सरकार देत आहे. परंतू या बीजेपी शासनाने मनपाला निधी दिलेला नाही मराठवाडा पॅकेज अंतर्गत निधी येत होता तो निधी आता येणे बंद आहे. कामाची गती फार संथ आहे. खडडे सुध्दा बुजविण्यात येत नाही. आम्ही निवडून दिले आहे म्हणुन आपण काम केले पाहीजे असे लोक आम्हाला म्हणत आहेत. पीरबु-हानच्या एसटी क्वाटरच्या जवळ खडडा पडला आहे तो तात्काळ बुजविण्यात यावा. लहान लहान कामासाठी नगरसेवकांना त्रास होत आहे. अशा कामावर आपण लक्ष देवून पुर्ण करुन दयावे, अशी विनंती आहे.

**फारुख बदवेल** कोणताही आयुक्त येत आहे तो केवळ 7 ते 8 महीणे राहत आहे यामुळे आमच्या वार्डाचा विकास होत नाही. रमजानचा पवित्र महीणा सुरु होत आहे. या काळात पाणी सर्वांना मिळाले पाहीजे. कार्यकारी अभियंता म्हणतात की पाण्याची टाकी भरली नसल्याने पाणी देता आले नाही याचे काय कारण आहे ती टाकी का भरण्यात येत नाही. कच-याचे ढिगारे साचले आहेत आणखी आमच्या वार्डात गाडया आलेल्या नाहीत. पाण्याचा खुलासा करावा.

**अब्दुल सत्तार** भाजीपाला मार्केट तोडले आहे त्या लोकांचे नुकसान झालेले आहे. त्याला कोण जबाबदार आहे याचा खुलासा करावा. गेल्या दिड वर्षापासुन काम चालू होते तर आपले अधिकारी काय काम करीत होते. प्रथम त्या अधिकारी यांच्यावर कार्यवाही झाली पाहीजे. किमान दोन कोटीचे यात नुकसान झालेले आहे. याला जबाबदार कोण आहे याचा खुलासा झाला पाहीजे.

**अ. हफीज बागवान** शहरात इतर ठिकाणी काम चालू नाहीत काय. हेच काम चालू होते काय इतर लोकांचे बांधकामे का तोडण्यात आली नाहीत याचा खुलासा करावा. या लोकांना का वेळ दिला नाही. आदेश काढूनही ते का तोडण्यात आले याचाही खुलासा करावा. याला जबाबदार अधिकारी आहेत त्यांना निलबिंत करावे.

**अब्दुल सत्तार** जर हे बांधकाम होत असतांना त्यास Plinth लेवललाच थांबविले असते तर चांगले झाले असते पुर्ण बांधकाम होवू देवून पाडणे हे योग्य नाही. क्षेत्रिय अधिकारी व इमारत निरीक्षक यांच्या वर कार्यवाही केली पाहीजे. जे अधिकारी दोषी आहेत त्यांना तात्काळ निलबिंत करण्यात यावे. लोक मनपा ही कॉंग्रेस पक्षाची आहे त्यामुळे आमच्या पक्षाची बदनामी होत आहे.

**महापौर** अब्दुर सत्तार भाई यांनी जो प्रश्न विचारला आहे याबाबतचा खुलासा प्रशासनाने करावा.

**उप आयुक्त (विकास)** ज्या जागेवर फळाचे दुकान लावण्यात आलेली आहेत त्या ठिकाणा मुळे विमानच्या उडाण करण्यास बाधा निर्माण होत होती. सन 2016 मध्ये 42 दुकानास सहा महीण्याच्या कालावधीकरीता परवानगी महानगरपालिकेने दिली होती. या दोन वर्षाच्या कालावधीत त्यांनी विमान तळाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केले नाही. याच गाळयाच्या बाजुला इतर लोकांनी टीन शेड बांधण्यात आले होते. विमान तळाचे सुरक्षा समिती बैठक होत असते त्या बैठकीत सुध्दा हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. जो व्यवसाय आहे त्यास पक्षी अट्रक्याक होणार आहे. विमानाच्या सुरक्षेला धोका निर्माण झालेला आहे. ज्या 42 गाळे धारकाचे कच्चा माल शिप्ट करण्यात वेळ देणे आवश्यक

होते. आणि त्या लगत इतर गाळे धारकाने दुकाने बांधली होती पण त्यात व्यवसाय सुरु झालेला नव्हता अशी गाळे तात्काळ तोडणे आवश्यक होते म्हणुन ती दुकाने तोडण्यात आली आहेत. ज्यांना आपण परवानगी दिली होती त्यांना तीन महीण्याचा कालावधी देण्यात आला. महानगरपालिका अधिनियमानुसार अनाधिकृत बांधकामे पाडण्याचे अधिकार आयुक्तांना दिले असल्याने त्यांच्या वतीने इतर अधिकारी वर्गाने ही कार्यवाही केली आहे. शहरात विमान चालू राहणे त्याची सुरक्षा करण्याची जबाबदारी ही आयुक्ताची आहे जी कार्यवाही केली आहे ती नियमानुसारच केली आहे. शासनाने एक नियम काढला आहे की सन 2015 नतरची बांधकामे नियमीत करण्याची संधी नागरीकांना दिली आहे त्यामुळे जुन महीण्यापर्यत बांधकामे नियमीत करण्याचे प्रस्ताव मनपा स्विकारीत आहे. त्यानुसार आपली बांधकामे नियमीत करुन घ्यावे त्यानंतर आपण बांधकामे हे तात्काळ पाडणार आहोत.

**फारुख बदवेल** सहा महीण्याची परवानगी देण्यात आली होती आता त्यांना न सांगता शेड तोडण्यात आले. जो जमीन मालक होता त्यांने जमीन विकुन निघुन गेला ज्या गरीब लोकांनी ही जागा घेतली आहे त्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपच्या पक्षाची बदनामी झालेली आहे याला जबाबदार कोण आहे. ज्या अधिका-याने हे तोडले आहे त्याच्या पगारीतुन पैसे वसुल करावे. यांना लोकांना मनपाने जागा का दिली नाही.

**अ.हफीज बागवान** या व्यापा-यांना जागा देण्याचा विषय आला आहे. त्यांना जागा का देण्यात येत नाही असे सांगावे मनपाचे कर्तव्य आहे त्या लोकांना जागा दिली पाहीजे. तोडता येते त्याच धर्तीवर जागा पण मनपाने देण्याची व्यवस्था करावयास पाहीजे.

**सभागृह नेता** आपल्या अधिका-यांनी योग्य वेळी निर्णय घेतला असता तर या व्यापा-याचे नुकसान झाले नसते. मनपाने त्यांना एनओसी दिली होती. अशा लोकांची व्यवस्था मनपाने करणे आवश्यक आहे. भाजी पाला मार्केट व फळ मार्केट च्या मालाच्या गाडया शहरात येत होत्या म्हणुन हा व्यवसाय हा शहरा बाहेर नेण्यात आला आहे. कारण शहरातील नागरीकांना मोठया वाहनाचा त्रास होवू नये यासाठी केलेली उपाययोजना होती. मनपाने जागेचा शोध घ्यावा व त्यांना जागा देण्याची व्यवस्था करावी. जे लोक याचा विषय बनवित आहेत त्याना हा प्रश्न सोडवावयाचा नाही ही बाब सत्य आहे. त्यांना काम करुन घ्यावयाचे आहे. मा. जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करुन त्वरीत निर्णय घ्यावा.

**बाळु राऊत** आम्ही सभागृहात येवुन सहा महीण्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. मालेगांव रोड खराब झालेला आहे त्यामुळे या रस्त्यावर अपघात होवून मुलाचा मृत्यू झालेला आहे. तरोडा एरीयातील रस्ते सुध्दा खुप खराब झालेले आहेत या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी. लाईटही लावण्यात येत नाही. आमच्या प्रभागात अदयाप मनपाने काम सुरु केले नाही.

**साबेर चाऊस** विमान प्राधिकरणाचे जे पत्र आपल्याला आलेले आहे ते पत्र आम्हाला दर्शवावे. खुराणा मोटर्सची मालमत्ता तोडण्याचा निर्णय झालेला आहे मग अशा वेळी एकच मालमत्ता का तोडण्यात आली इतरही मालमता का तोडण्यात आलेल्या नाहीत. तरोडयातील पाण्याची टाकी आपण तोडली आहे. तसेच तरोडयात जी.प. च्या मालकीचे इमारतीस परवानगी देवू नये असे कळविण्यात आले होते. याचा खुलासा करावा.

**सौ गोडबोले** आम्ही पाण्यासाठी वांरवार बोलत आलो आहोत परंतू पाण्याचा प्रश्न काही सोडविण्यात येत नाही. कार्यकारी अभियंता यांना सांगुनही काही फरक पडत नाही. पाणी सोडण्याचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे. गांधी पुतळा / खडकपुरा पाण्याची टाकी हे आमच्या एरीया पासुन खुप जवळ आहेत तरीही आम्हाला पाणी मिळत नाही आताही आमच्याकडे पाण्याचे टॅंकरच्या सहाय्याने पाणी पुरवठा केला जात आहे. अधिकारी लोक आम्हाला योग्य पध्दतीने उत्तरे देत नाहीत. आमची दिशाभुल करीत आहेत. आमच्या प्रभागात बोरवेल आहेत ते चालू करुन दयावे. पावर पंम्प बसविण्यासाठी विनंती केली असता ते काम त्यांनी केले नाही म्हणुन मी काळी फीत लावून प्रशासनाचा निषेध करते. पाणी पुरवठा अभियंता श्री अंधारे यांना निलबिंत करावे अशी सभागृहास विनंती करते.

**गोंधळ सुरु झाला.**

**अब्दुल सतार** आमचे सभागृह नेता यांनी फळ मार्केट यांच्या बाबतचा विषय मांडला त्या पध्दतीने तो प्रश्न सोडविण्यात यावा. त्या व्यापा-याचे नुकसान झाले नसते. त्यांना जागा कशी देता येईल हे पहावे. फ्रुट मार्केट, भाजीपाला मार्केट व मटन मार्केटला जागा देण्यात यावी. मा. जिल्हाधिकारी यांच्या कडे बैठक लावावी. मनपाची जबाबदारी आहे त्यांचे पुनरवसन करावे. बरेच मालमता या अनाधिकृत आहेत त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. मनपाची जमीनीवर कब्जा केलेला आहे तो कब्जा उठविण्यात यावा. फ्रुट मार्केट, भाजीपाला मार्केट व मटन मार्केटवर अतिक्रमण केले आहे ते अगोदर

उठविण्यात यावे. जे स्वतःचे बांधकाम करीत आहेत त्यांना तोडायचे हे बरोबर नाही. आयुक्त साहेब या प्रकरणात आपण लक्ष घ्यावे. मोठया इमारतीचे बांधकाम झाले आहे त्यांच्यावर बांधकामे पाडण्याची कार्यवाही करावी. नाहीतर आम्हाला भविष्यामध्ये अंदोलन करावे लागणार आहे.

**आयुक्त** मा. महापौर महोदया, फ्रुट मार्केट, भाजीपाला मार्केट यांच्या प्रतिनिधी व विमान तळ प्राधिकरण यांची तात्काळ बैठक बोलवून त्यांना जागा कशी लवकर देता येईल याबाबत त्वरीत निर्णय घेण्यात येईल. दुसरा विषय पाण्याचा आहे दुधना धरणातुन पाणी सोडले आहे ते पाणी आपणास मिळाले आहे. मी काल परभणी जिल्हाधिकारी यांच्याशी बोलने झाले आहे. दिग्रस बंधा-यातुनही पाणी मिळणार आहे. पाण्याची आपणास अडचण येणार नाही. पाण्याच्या वेळा काय असाव्यात याचे नियोजन केले आहे. पाणी कमी अधिक सोडले याचे लोकांची नाराजी नसते पाणी ज्या वेळात येणार आहे त्या वेळी पाणी लोकाना मिळाले पाहीजे. सर्व सदस्यांना पाणी सोडण्याचे वेळापत्रक आपणास देण्यात येईल. पेपरमध्ये लहान जाहीरात दिली आहे. आपल्या वेबसाईटला सुध्दा हे वेळापत्रक टाकलेले आहे. एमएससीबी या कार्यालयाशी सुध्दा बोलने झाले आहे. त्यांच्याकडून विदयुत पुरवठा सुरळीत करण्यात यावा. कचरा उचलण्याचे नियोजन करीत आहोत.

**सहाय्यक आयुक्त(स्वच्छता)** मा. महापौर महोदया, प्रत्येक प्रभागात दोन टाटा एस व एक 407 गाडी ठेवण्यात येणार आहे. या सहाय्याने कचरा उचलण्यात येणार आहे.

**उप आयुक्त (विकास)** दरवर्षी आपण रमजान महीण्यात जी व्यवस्था करतो ती यावर्षीही केलेली आहे. शहरात जे प्रार्थना स्थळे आहेत त्या ठिकाणी स्वच्छता सकाळी व सांयकाळी अशा दोन्ही वेळात ठेवलेली आहे. ज्या एरीयामध्ये मुस्लीम बांधव आहेत त्या एरीयातील पाण्याच्या टाक्या भरण्यात येतील व त्यांना पाणी हे मुबलक प्रमाणात देता येईल अशा पध्दतीचे नियोजन केलेले आहे. शहरातील सर्व बोरवेल चालू करुन घेण्यात येत आहे शिल्लक राहीलेले जवळपास 100 पंम्प हे चालू करुन घेण्यात येणार आहे. ड्रेनेजचे पाणी रस्त्यावरुन वाहते त्यासाठी लेबर हे कंत्राटदारा कडून घेवून ड्रेनेजची सफाई करुन घेणार आहोत. तसे लेबर आपण घेतलेले आहेत. शहरातील दिवा बत्ती असेल , कच-याचा विषय, पाण्याचा प्रश्न असेल यासाठी आपण आमच्याकडे संपर्क साधावे त्या तक्रारीचे निवारण तात्काळ करण्यात येईल.

**किशोर स्वामी** पावसाळयात प्रत्येक झोनला एक उप आयुक्त लेवलचा अधिकारी देण्यात यावा. अधीक मास, रमजान महीना आहे या काळात लाईट, पाणी व साफसफाईची काही अडचणी आल्यास आपणास सोडविण्यास सोईचे होईल. ही नियुक्ती एका महीण्याकरीता करावी. एका कार्यकारी अभियंत्यावर पुर्ण शहराचा लोड टाकला तर काम होवू शकणार नाही.

**सौडी गुरप्रीतकौर** पाईप चोरीचे या शहरात मोठया प्रमाणात झालेले आहे. आयुक्त साहेब हे प्रकरण आपणास माहीत नाही. मी याबाबतचे सर्व पुरावे सोबत आणले आहे. यात नगरसेवकाची बदनामी झालेली आहे. पाईप लाईनच्या कामाचे उदघाटन सभापती यांनी केले आहे. मग मार्क आउट दिले नाही असे सांगण्यात आले होते तरी सभापतीने उदघाटन कसे केले आहे. आम्ही सुध्दा नगरसेवक आहोत आम्हाला सभागृहात बोलण्याचा अधिकार आहे. याची चौकशी तात्काळ करण्यात यावी.

**सभागृह नेता** मागच्या मिटींग मध्ये आम्ही सांगीतले की यात नगरसेवकाचा समावेश आहे तर त्यांच्या कार्यवाही झाली तरी आम्हाला काही अडचण नाही ते स्वतःहुन राजीनामा देतील जर ते दोषी असतील तर. तर यांनी तरी राजीनामा दयावा.

**अब्दुल सत्तार** सोडी मॅडमची मागणी आहे की, चौकशी करण्यात यावी मग ते चौकशी करण्याचा अधिकार आपणास आहे काय याचा खुलासा करावा. ही महापालिका आयुक्तांना कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत काय ? पोलीस कार्यवाही चालू आहे. मग ते दोषी नसतील तर यांच्यावर कार्यवाही झाली पाहीजे.

**दिपकसिंह रावत** सोडी मॅडमवर कार्यवाही करण्याची मागणी आपली बरोबर नाही. हे प्रकरण ते उघडकीस आणत आहेत त्यांच्यावर कार्यवाही कसी करता येईल.

**सभागृह नेता** आमचे नगरसेवक दोषी नसतील तर आपण किमान सभागृहात माफी मागणार का याचा खुलासा सौ. सोडी मॅडमने करावा.

**गोंधळ चालू होता.**

**उप महापौर** पाईप चोरी संबधीचे प्रकरण हे न्यायालयात चालू आहे त्यामुळे या विषयावर सभागृहात चर्चा करता येणार नाही.

**महापौर** आयुक्तांनी खुलासा करावा.

**आयुक्त** प्रस्तुत प्रकरण हे स.न्यायालयात चालू असल्याने या ठिकाणी या प्रकणात चर्चा करता येणार नाही.

**मोहीणी येवनकर** पाणी आपल्याकडे असतांना देखील आपणास पाणी हे वेळेवर देण्यात येत नाही. पाणी सोडण्याचे वेळापत्रक निश्चीत केल्यानुसार पाणी शहरातील नागरीकांना देण्याची व्यवस्था करावी.

**उमेश चव्हाण** शहरातील प्रश्न सोडवण्यात येतील असे आताच उपआयुक्तांनी सांगीतले परंतू आता शहरातील किती ठिकाणी चेंबर भरुन वाहत आहेत किती चेंबरवर कव्हर नाहीत, किती ठिकाणी लाईटची व्यवस्था नाही याची माहीती आम्हाला देण्यात यावी. मागील कित्येक महीण्यापासुन आमच्या एरीयामध्ये लाईट बसविण्यात आलेले नाही. कारण सांगीतले जाते की लाईटची खरेदी करता येणार नाही. आम्हाला लोकांनी निवडून दिलेले आहे. दिवाबत्ती किती दिवसात करणार हे आम्हाला सांगावे. पाण्याचे वेळापत्रक आम्हा केंव्हा देणार हे कळवावे. आपल्याकडे पाणी मुबलक प्रमाणात आहे ते योग्य पध्दतीने पुरवठा करण्याचे नियोजन करावे. आम्हाला सोलार लाईट बाबत एक जीआर दाखविण्यात येते संबधीतास बोलून खुलासा करावा.

**अब्दुल फईम** लाईट लावण्यासाठी सांगीतले तर लाईट लावण्यासाठी लाईटची खरेदी करणे बंद आहे असे सांगण्यात येते हे योग्य नाही लाईट तरी लावून दयावे अशी आपणास विनंती आहे.

**कविता मुळे** पाण्याच्या वेळा बाबत आताच सांगण्यात आले. पंरतू मागील दोन महीण्यापासुन तरोडयातील मेन्टनसचे काम का करुन घेतले नाही याचा खुलासा करावा. जागो जाग पाण्याचे पाईप फुलेले असल्याने पाण्याचा अपव्य होत आहे. पाण्याचा प्रश्न गंभीर आहे.

**सभागृह नेता** आता जो प्रश्न उपस्थित झाले आहेत ते म्हणेज लाईटची खरेदी आपणास करावयाची नाही शासनाने एक कंपनी नियुक्ती केली आहे त्यांनीच आपले सर्व लाईट एलईडी बसवून दयावे. त्यामुळे लाईट लावण्यात येत नाहीत. सर्व नगरसेवकाची मागणी आहे किमान त्यांच्या वार्डात लाईटची तरी सुविधा देण्यात यावी. नविन लाईट सेट खरेदी करण्यास काहीच अडचण नाही असे वाटते. जो तरोडयाचा पाणी पुरवठयाच्या लाईनचा मेनटसचा प्रश्न आहे तो सोहेल एजन्सीला आपण काळया यादीत टाकले आहे त्यामुळे त्या एरीयातील कामे होत नाही. एमआरसी नसल्याने कामे होत नाहीत. सौ गोडबोले मॅडमच्या वार्डात ही पाण्याचा प्रश्न आहे त्यांनी आज काळी फीत लावून सभागृहात आलेल्या आहेत. त्यांना पाणी मीळत नाही ही बाब योग्य नाही. एमआरसीचे दोन लेबर येवून काम करीत आहेत यात लेबरची संख्या वाढ केली पाहीजे. लहान लहान प्रश्न आहेत ते सोडवणे अत्यंत गरजेचे आहे. याकरीता मोठा निधीही गरज नाही. या प्रश्नाकडे आयुक्त महोदयांनी लक्ष घालावे अशी मी विनंती करतो.

**सतिश देशमुख** सोहेल कंपनीला काळया यादीत टाकले आहे. पाणी पुरवठयाचे मेन्टसचे कामे पुर्ण पणे बंद आहेत. दुसरी एजन्सी फीक्स करुन तरोडयातील कामे करुन दयावे. दोन निविदा आलेल्या असतील तर त्या विशेष अधिकाराचा वापर करुन त्या अंतिम कराव्यात. व कामे चालू करावे. जे लिकेजेस आहेत ते दुरुस्त करुन दयावे.सांगवी तरोडा हे ग्रामपंचायतीचा एरीया आहे त्यामुळे ब-याच खांबावर लाईटच्या फिटींग नाहीत. ते बसविण्यात यावे.

**अरशीया बेगम** शहरात पाणी पुरवठयाच्या मेन्टसची कामे बरीच प्रलबिंत आहेत शहरातील पाणी हे वाया जात आहे आता उन्हाळयाचे दिवस आहेत लाखो लिटर पाणी वाया जात आहे त्याकरीता ते पाणी वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी.

**जयश्री पावडे** आपले नांदेड नगरीमध्ये स्वागत करते. जुने स्टेटमेट होते की, दररोज कमी का होईना पाणी नियमीत दिले पाहीजे. तुम्ही पाण्याचा जो प्लान देणार आहात त्यानुसार आम्हाला पाणी मिळाले पाहीजे अशी अपेक्षा आहे. आपण चांगले काम करताना आम्ही सर्व नगरसेवक आपल्या सोबत आहोत. आपण चांगल काम कराव अशीही अपेक्षा करते. महीला नगरसेवकाचे काही प्रश्न असतील ते त्वरीत सोडवावे.

**राजु काळे** आपण एवढे पैसे खर्च करुन पाणी मागविले आहे. त्या पाण्यामध्ये दवाखाण्याचे घाण पाणी या पाण्यात मिळत आहे. एका शेतक-याने ते पाणी अडविले आहे यासाठी आपण काही उपयायोजना करणार आहात काय याचा खुलासा करावा.

**उप महापौर** दवाखान्याचे डॉक्टर व पोलुषन बोर्डाच्या अधिकारी यांनी त्या पाण्याची जावून पहाणी केली आहे त्यावर त्वरीत उपाय योजना होईल अशी अपेक्षा आहे. तो प्रश्न तात्काळ निकाली निघेल अशी अपेक्षा आहे.

**किशोर स्वामी** विमान तळ प्राधिकरण यांच्या सोबत आम्ही तत्कालीन आयुक्त यांनी जावून चर्चा केली की, पावसाळयाच्या दिवसात विमान तळाच्या एरीयाचे पुर्ण पाणी हे पीरबु-हान नगरच्या रस्त्याने वाहते त्याचा त्रास लोकांना सहन करावा लागतो. त्यांनी पाण्याची विल्हेवाट लावली पाहीजे. परंतू आता

| | |
|---|---|
| | 15 दिवसावर पावसाळा येवून ठेपला आहे त्यांनी आतापर्यत काहीच कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे विमान प्राधिकरणास पुन्हा एकदा पाण्याच्या संदर्भात चर्चा करावी. आमच्याकडे पाणी येणार नाही याची काळजी घ्यावी. लहान नाल्याची सफाई झालेली नाही. तीही करुन घ्यावी. |
| **आंनद चव्हाण** | विमान तळ प्राधिकरण यांच्या सोबत आम्ही व तत्कालीन आयुक्त यांनी जावून चर्चा केली त्या मिटींगनतर काय कार्यवाही करण्यात आली याची माहीती देण्यात यावी. |
| **उमेश चव्हाण** | लाईटच्या संदर्भात प्रथम खुलासा करण्यात यावा. |
| **अब्दुल रशीद** | लाईटचा कंत्राटदार काम करीत नाही बील मात्र उचलत आहे. त्याकरीता लाईटचे मेंटन्सचे पैसे देण्यात येवू नये. एका महीण्याचे पैसे कपात करावे. |
| **आयुक्त** | मा.महापौर महोदया, लाईटच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे त्या संदर्भात मी संबधीत अधिकारी यांची बैठक घेवून लाईटचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल. विमान तळाच्या पाण्याचा प्रश्न आहे तो आपण सदरची मिटींग पुर्ण झाल्यानंतर बसुन तो प्रश्न निकाली काढू. |
| **बालाजी कल्याणकर** | आमच्या एरीयातील नालीच्या वरुन खुप पाणी वाहत असते त्यामुळे लहान मुलाना या पाण्यातून जावे लागत आहे. त्याकरीता या पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने करुन घ्यावा. |
| **बापुराव गजभारे** | सदस्यांचे फोन अधिकारी वर्गाने घेतले पाहीजे किंवा नाही याचा खुलासा याच ठिकाणी करण्यात यावा. श्री अंधारे कार्यकारी अभियंता यांनी फोन उचलला नाही. माझ्याकडे 100 लेडीजचे शिष्ट मंडळ आले होते त्यावेळी मी उप आयुक्त रत्नाकर वाघमारे यांनी फोन केला त्यांनी माझ्या एरीयातील प्रश्न जाणुन घेतला त्याबददल मी त्यांचे अभिनंदन करतो. मी सर्व सामान्य कार्यकर्ता आहे. माझा रात्री दोन वाजता मा. जिल्हाधिकारी फोन उचलतो आणि श्री अंधारे साहेब हे फोन का उचलत नाही याचा खुलासा करावा. |
| **कार्यकारी अभियंता पापु** | माझा फोन 24 तास चालू रहातो. नजर चुकीने मी फोन घेतला नसेल परंतू मी यापुढे फोन उचलतो. |
| **महापौर** | विषयपत्रीका सुरु करावी. |

<u>**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**</u>

**विषय कं. 01**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. अग्रीम 2015/15 विनियम दिनांक 26 ऑक्टोंबर 2015 नुसार सण अग्रीम रक्कम मंजुर करण्याचा शासन निर्णयानुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/02/2018 दिनांक 02.04.2018 अन्वये **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी वैशाखी पौर्णिमा (भगवान बुध्द जयंती) निमित्त प्रति कम्रचारी सण अग्रीम रक्कम रुपये 10,000/- या प्रमाणे एकूण कर्मचारी रुपये 79,90,000/- मंजुर करण्यात आले संबंधीतांच्या वेतनातुन रुपये 1000/- समान 10 हस्यातुन कपात करुन मनपा फंडात जमा करण्यास मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

**महापौर** कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 40** **ठराव**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. अग्रीम 2015/15 विनियम दिनांक 26 ऑक्टोंबर 2015 नुसार सण अग्रीम रक्कम मंजुर करण्याचा शासन निर्णयानुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/02/2018 दिनांक 02.04.2018 अन्वये **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कर्मचा-यांनी वैशाखी पौर्णिमा (भगवान बुध्द जयंती) निमित्त प्रति कम्रचारी सण अग्रीम रक्कम रुपये 10,000/- या प्रमाणे एकूण कर्मचारी रुपये 79,90,000/- मंजुर करण्यात आले संबंधीतांच्या वेतनातुन रुपये 1000/- समान 10 हस्यातुन कपात करुन मनपा फंडात जमा करण्यास मान्यता देण्यात आली त्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देते.**

**विषय क्रं. 02**

**विषय :-** <u>बि.एस.एन.एल. मोबाईल टॉवरसाठी जागा भाडेपट्‌टीवर देणे बाबत.</u>

सहाय्यक महाव्यवस्थापक (plg) भारत संचार निगम लिमिटेड, नांदेड यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मनपा मालकीचे (1) केळी मार्कट येथील जागा (2) किल्ला रोड येथील जागा (3) मध्यवर्ती जकात नाका येथील अपेक्षा हॉस्पीटल छतावर या ठिकाणी बि.एस.एन.एल चे मोबाईल टावर उभारणी करण्यासाठी जागा भाडेपट्‌टीवर मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नावाशमनपा, नांदेड यांनी अहवाल दिल्यानुसार मध्यवर्ती जकात नाका येथील अपेक्षा हॉस्पीटल या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीटसाठी पाठविले असता अहवाल अप्राप्त असुन केळी मार्कट येथील जागा व किल्ला रोड येथील जागेवर मोबाईल टावर देण्यास हरकत नसल्याचे अहवाल दिला आहे.

तसेच सदरील दोन्ही ठिकाणच्या जागेचे भाडे सहाय्यक संचालक नगररचना यांच्याकडून निश्चित करुन घेण्यात आले असता केळी मार्कट येथील 180.00 चौ.मी. जागेस प्रतिमहा भाडे रुपये 7200/- व किल्ला रोड येथील 205.20 चौ.मी. जागेस प्रतिमहा भाडे रुपये 6669/- इतके भाडे निश्चित केले आहे.

तरी सदरील जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) प्रमाणे पुढील तीन वर्षासाठी भाडेपट्टीवर देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेस मान्यतेस्तव सादर.

**फारुख बदवेल** ज्या जागेवर हे टावर बसविण्यात येत आहे त्या जागेवर जावुन मी या टावरचे काम थांबविले आहे.

**अब्दुल हाफीज बागवान** दवाखान्याच्या एरीयामध्ये टावर बसविण्यात येवू नये.

**उमेश चव्हाण** हा प्रस्ताव प्रशासनाने पाठविलेला असल्याने त्यांनी हा प्रस्ताव वापस घ्यावा. हा विषय पेडींग ठेवण्यात येवू नये.

**सभागृह नेता** दवाखान्याच्या जागेत सदरचे टावर उभारण्यात येत आहे काय याची माहीती घेण्यात यावी. या टावरमुळे पेशंन्टला त्रास होवू शकतो त्यामुळे या जागेवर हे टावर उभारण्यात येवू नये अशी मागणी त्या एरीयातील नगरसेवकांची आहे.

**उप महापौर** सदरील विषय हा सविस्तर माहीतीसह पुढील मिटींगला प्रशासनाने आणावा.

**उमेश चव्हाण** सदरचा विषय सभागृहाने रदद केला आहे.

**अब्दूल सत्तार** जीबीची मान्यता गृहीत धरुन एनओसी देण्यात आलेली आहे किंवा नाही याचा खुलासा करण्यात यावा.

**मालमता व्यवस्थापक** संबधीतास आपण तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्यांच्या वरीष्ठ कार्यालयास कळविण्याएवढीच मान्यता दिलेली आहे. परंतू सर्व साधारण सभेत जो निर्णय होईल त्यानुसार संबधीत कार्यालयास कळविण्यात येईल.

**महापौर** बिएसएनएल मोबाई टॉवरसाठी देण्यात येणारी जागा भाडे पट्टीवर देण्या बाबतचा प्रशासनाचा प्रस्ताव फेटाळण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 41** **ठराव**

**विषय :- बि.एस.एन.एल. मोबाईल टॉवरसाठी जागा भाडेपट्टीवर देणे बाबत.**

सहाय्यक महाव्यवस्थापक (plg) भारत संचार निगम लिमिटेड, नांदेड यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीमध्ये मनपा मालकीचे (1) केळी मार्केट येथील जागा (2) किल्ला रोड येथील जागा (3) मध्यवर्ती जकात नाका येथील अपेक्षा हॉस्पीटल छतावर या ठिकाणी बि.एस.एन.एल चे मोबाईल टावर उभारणी करण्यासाठी जागा भाडेपट्टीवर मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नावाशमनपा, नांदेड यांनी अहवाल दिल्यानुसार मध्यवर्ती जकात नाका येथील अपेक्षा हॉस्पीटल या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीटसाठी पाठविले असता अहवाल अप्राप्त असुन केळी मार्केट येथील जागा व किल्ला रोड येथील जागेवर मोबाईल टावर देण्यास हरकत नसल्याचे अहवाल दिला आहे.

तसेच सदरील दोन्ही ठिकाणच्या जागेचे भाडे सहाय्यक संचालक नगररचना यांच्याकडून निश्चित करुन घेण्यात आले असता केळी मार्केट येथील 180.00 चौ.मी. जागेस प्रतिमहा भाडे रुपये 7200/- व किल्ला रोड येथील 205.20 चौ.मी. जागेस प्रतिमहा भाडे रुपये 6669/- इतके भाडे निश्चित केले आहे.

तरी सदरील जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) प्रमाणे पुढील तीन वर्षासाठी भाडेपट्टीवर **देण्यासाठीचा प्रस्ताव हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते फेटाळण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं. 03**

मनपा सर्वसाधारण सभेने दिनांक 07.03.2018 रोजीच्या सभेतील ठराव क्रं. 102 अन्वये पारीत करुन सदर ठरावामध्ये उपसुचना `` प्रशासनाच्या प्रस्ताव मान्य तथापि यामध्ये मा. आयुक्त यांचे सोबत मा. महापौर, मा. उपमहापौर, श्री स. शेर अली म. महेबुब अली सदस्य, सौ. मोरे दिपाली संतोष स.सदस्या यांचे मान्यतेने प्राधिकृत करण्याची अशी उपसूचनेसह प्रशासकीय प्रस्ताव ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो `` , असे नमूद केलेली आहे. परंतु भविष्यात सदरील सदस्य हे मनपा सर्वसाधारण सभेचे सदस्य असतीलच असे नाही. त्यामुळे सदर बाबत कार्यवाही करण्यासाठी तांत्रीक अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करिता सदर उक्त बाबींचा विचार करता मनपा सर्वसाधारण सभेने दिनांक 07.03.2018 रोजीच्या सभेतील ठराव क्रमांक 102 मधील सदर उपसूचना वगळण्याबाबत मनपा सर्वसाधारण सभेकडे सादर.

**महापौर** प्रशासनाच्या प्रस्ताव मान्य तथापि यामध्ये मा. आयुक्त यांचे सोबत मा. महापौर, मा. उपमहापौर, श्री स. शेर अली म. महेबुब अली सदस्य, सौ. मोरे दिपाली संतोष स.सदस्या यांचे मान्यतेने प्राधिकृत करण्याची अशी उपसूचनेसह प्रशासकीय प्रस्ताव ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो सदरचे सदस्य हे सार्वत्रिक निवडणूक 2022 पर्यंत नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**ठराव क्रं. 42** **ठराव**

मनपा सर्वसाधारण सभेने दिनांक 07.03.2018 रोजीच्या सभेतील ठराव क्रं. 102 अन्वये पारीत करुन सदर ठरावामध्ये उपसुचना `` प्रशासनाच्या प्रस्ताव मान्य तथापि यामध्ये मा. आयुक्त यांचे सोबत मा. महापौर, मा. उपमहापौर, श्री स. शेर अली म. महेबुब अली सदस्य, सौ. मोरे दिपाली संतोष स.सदस्या यांचे मान्यतेने प्राधिकृत करण्याची अशी उपसूचनेसह प्रशासकीय प्रस्ताव ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो `` , असे नमूद केलेली आहे. परंतु सदरील सदस्य हे महानगरपालिका कार्यकाळ सालसन 2022 पर्यंत असल्याने संबंधीतास प्रधिकृत करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. तसेच सदरील सदस्यांची मुदत संपल्यानंतर प्रशासनाने फेर प्रस्ताव महासभेसमोर मान्यतेस्तव सादर करावा असे ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 04**

**विषय** :- <u>**स्वच्छता निरिक्षक व प्रभारी स्वच्छता निरिक्षक यांना प्रती महा रु. 3000/- वाहन भत्ता मिळणे बाबत**</u>

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्रीय कार्यालय क्रं. 1 ते 6 अंतर्गत प्रभाग क्रं. 1 ते 20 मध्ये संपूर्ण साफसफाईच्या कामाचे योग्य नियोजनास्तव स्वच्छता निरिक्षक व प्रभारी स्वच्छता निरिक्षिक हे दररोज प्रभागांतर्गत सकाळी 06.00 वाजे पासुन नेमुन दिलेल्या ठिकाणी हजर होऊन त्यांचे हजेरी घेणे, सफाई कामगारांना सफाईचे काम वाटप करणे, त्यांना दिलेल्या परिसर तपासुन तेथील सफाई करुन घेणे, स.सदस्य/सदस्या व नागरीकांचे प्राप्त होणा-या तक्रारीचे त्वरीत निवारण करणे, क्षेत्रीय कार्यालयात आणि मुख्यालयात अहवाल सादर करणे, मा. महापौर, उपमहापौर, मा.सभापती (स्थायी समिती), मा. आयुक्त व उपआयुक्त इत्यादी अधिकारी पदाधिका-यांनी वेळोवेळी आयोजीत बैठकीत उपस्थित राहणे व इतर कार्यालयीन कामकाजासाठी वाहनावर फिरणे अत्यंत आवश्यक असुन त्यासाठी सर्व संबंधीतांना लागणारा वाहनासाठी इंधनावर मोठया प्रमाणात खर्च येत आहेत.

सद्यस्थितीत प्रशासनाच्या वतीने प्रती महा रु. 960/- वाहन भत्ता देण्यात येत आहे सद्याचे पेट्रोल भाव रु. 80/- प्रती लिटर झाल्यामुळे देण्यात येत असलेल्या वाहन भत्ता अत्यंत अल्प प्रमाणात आहे. स्वच्छता निरिक्षक यांना कार्यालयीन कामकाजास्तव जवळपास कमीत-कमी 60 कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त फिरावे लागत आहेत.

करिता सर्वसाधारण सभेने दिनांक 05.01.2016 रोजी ठराव क्रं. 108 अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तिक शौचालय नसलेल्या घरांचा सर्व्हे करणे, प्रत्यक्ष स्थळ पाहणी व शौचालय बांधकामावर देखरेख ठेवणेसाठी कनिष्ठ अभियंता यांना प्रति महा रुपये 3000/- इतके वाहन भत्ता अनुज्ञेय करण्याचे समंत केलेल्या धर्तीवर सर्व स्वच्छता निरीक्षक व प्रभारी स्वच्छता निरीक्षक यांना प्रतीमहा देण्यात येत असलेल्या वाहन भत्ता रुपये 960/- ऐवजी प्रती महा रुपये 3000/- वाहन भत्ता अनुज्ञेय करणेसाठी मनपा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**महापौर** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 43** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्रीय कार्यालय क्रं. 1 ते 6 अंतर्गत प्रभाग क्रं. 1 ते 20 मध्ये संपूर्ण साफसफाईच्या कामाचे योग्य नियोजनास्तव स्वच्छता निरिक्षक व प्रभारी स्वच्छता निरिक्षिक हे दररोज प्रभागांतर्गत सकाळी 06.00 वाजे पासुन नेमुन दिलेल्या ठिकाणी हजर होऊन त्यांचे हजेरी घेणे, सफाई कामगारांना सफाईचे काम वाटप करणे, त्यांना दिलेल्या परिसर तपासुन तेथील सफाई करुन घेणे, स.सदस्य/सदस्या व नागरीकांचे प्राप्त होणा-या तक्रारीचे त्वरीत निवारण करणे, क्षेत्रीय कार्यालयात आणि मुख्यालयात अहवाल सादर करणे, मा. महापौर, उपमहापौर, मा.सभापती (स्थायी समिती), मा. आयुक्त व उपआयुक्त इत्यादी अधिकारी पदाधिका-यांनी वेळोवेळी आयोजीत बैठकीत उपस्थित राहणे व इतर कार्यालयीन कामकाजासाठी वाहनावर फिरणे अत्यंत आवश्यक असुन त्यासाठी सर्व संबंधीतांना लागणारा वाहनासाठी इंधनावर मोठया प्रमाणात खर्च येत आहेत.

सद्यस्थितीत प्रशासनाच्या वतीने प्रती महा रु. 960/- वाहन भत्ता देण्यात येत आहे सद्याचे पेट्रोल भाव रु. 80/- प्रती लिटर झाल्यामुळे देण्यात येत असलेल्या वाहन भत्ता अत्यंत अल्प प्रमाणात आहे. स्वच्छता निरिक्षक यांना कार्यालयीन कामकाजास्तव जवळपास कमीत-कमी 60 कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त फिरावे लागत आहेत.

करिता सर्वसाधारण सभेने दिनांक 05.01.2016 रोजी ठराव क्रं. 108 अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तिक शौचालय नसलेल्या घरांचा सर्व्हे करणे, प्रत्यक्ष स्थळ पाहणी व शौचालय बांधकामावर देखरेख ठेवणेसाठी कनिष्ठ अभियंता यांना प्रति महा रुपये 3000/- इतके वाहन भत्ता अनुज्ञेय करण्याचे समंत केलेल्या धर्तीवर सर्व स्वच्छता निरीक्षक व प्रभारी स्वच्छता निरीक्षक यांना प्रतीमहा देण्यात येत असलेल्या वाहन भत्ता रुपये 960/- ऐवजी प्रती महा रुपये 3000/- वाहन भत्ता अनुज्ञेय करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.05**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 82 दिनांक 22.08.2012 विखंडीत करण्यासाठी, निलंबीत करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2017/प्र.क्र.386/नवि-24 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 10 एप्रिल 2018 चा शासन निर्णय :-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने श्री सत्यमसिंह बलदेवसिंह परिहार यास अनुकंपा धर्तीवर विशेष बाब म्हणून लिपीक या पदावर नेमणुक देण्यास समंत केलेला ठराव क्रं. 82 दिनांक 22.08.2012 हा संयुक्तिक व सनदशिर ठरत नसल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451(1) अन्वये प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधीतांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांका पासून 30 दिवसांच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

**करिता शासनाने सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं. 82 दिनांक 22.08.2012 हा निलंबीत केलेला असुन त्याची नोंद घेणे बाबत.**

**महापौर** शासनाने मनपाकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं 82 दि. 22.08.2012 हा निलंबीत केलेला असुन त्याची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. 44** **ठराव**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 82 दिनांक 22.08.2012 विखंडीत करण्यासाठी, निलंबीत करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नावाशमनपा-2017/प्र.क्र.386/नवि-24 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 10 एप्रिल 2018 चा शासन निर्णय :-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने श्री सत्यमसिंह बलदेवसिंह परिहार यास अनुकंपा धर्तीवर विशेष बाब म्हणून लिपीक या पदावर नेमणुक देण्यास समंत केलेला ठराव क्रं. 82 दिनांक 22.08.2012 हा संयुक्तिक व सनदशिर ठरत नसल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 451(1) अन्वये प्रथमतः निलंबित करण्यात येत आहे.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधीतांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांका पासून 30 दिवसांच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

**करिता शासनाने सर्वसाधारण सभेने समंत केलेला ठराव क्रं. 82 दिनांक 22.08.2012 हा निलंबीत केलेला असुन त्याची नोंद हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.**

**विषय क्रं.06**

**विषय** :- श्री रत्नाकर कांतराव वाघमारे, उप आयुक्त (विकास) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांचा स्वेच्छा सेवानिवृत्ती बाबत

**संदर्भ** :- श्री रत्नाकर वाघमारे उपआयुक्त यांचा अर्ज दिनांक 13.04.2018

श्री रत्नाकर कांतराव वाघमारे, उप आयुक्त या पदावरुन स्वच्छा सेवानिवृत्ती मंजुर करण्याबाबत दि. 13.04.2018 रोजी अर्ज देवून महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1982 मधील नियम 30 (अ) नुसार स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजुर करावी अशी विनंती केलेली आहे.

सदरील अर्जामध्ये संबंधित हे आस्थापनेवर उप आयुक्त या पदावरुन कार्यरत असुन त्यांची मुळ नेमणुक दिनांक 01.04.1983 रोजी झालेली असुन महापालीकेच्या आस्थापनेवर विविध पदावर आजपर्यंत 33 वर्षांची सेवा पूर्ण झालेली आहे महाराष्ट्र नागरिसेवा नियम 1982 मधील नियम 30 (अ) नुसार कोणत्याही शासकीय कर्मचा-यांस अर्हताकारी सेवेची 30 वर्ष सेवा पुर्ण केल्यानंतर नियुक्ती प्राधिकरणास 03 महिणे अगोदर लेखी नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्त घेता येते.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत संबंधिताची सेवा मागिल 33 वर्ष् झालेली असून त्यांनी वैयक्तीक व कौटंबिक कारणास्तव ते दिनांक 01.08.2018 पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त होवु ईच्छीत असल्याचे त्यांनी अर्जात नमुद केले आहे.

संबंधितांच्या मुळ संवापटानुसार त्यांची जन्म दिनांक 20.03.1964 अशी असुन त्यांना आज (54) वर्ष (01) महिना होत आहे. त्यांना दिनांक 01.04.1983 रोजी लिपीक या पदावर सेवेत समाविष्ट करुन घेण्यात आले आहे.

कार्यालयीन आदेश क्र.आस्था-1/3536/06,दिनांक 17.06.2006 अन्वये संबंधितांस सध्याचे वेतन संरक्षित करुन व मागील सेवेचे सातत्य कायम ठेवुन सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 39 दिनांक 24.05.2006 अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार ( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 45 अन्वये सदर पदाची त्यांची नियुक्ती शासनाकडे कायम करण्याच्या अधिन राहुन ) आस्थापनेवरील उप आयुक्त या अभिमानाच्या पदावर वेतनश्रेणी रु.8000-13500 अधिक महागाई भत्ता ईत्यादी मध्ये नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली.सदर नियुक्तीस महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक नांमपा 1306/811/प्र.क्र.236/नवि-24 दिनांक 29 नोंव्हेंबर 2006 अन्वये संबंधितांची दिनांक 17.06.2006 पासूप सरळसेवेने केलेल्या नियुक्तीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनीयम 1949 चे कलम 45(4) अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन ) नियम 1982 चे नियम 65 (1) मध्ये शासकीय कर्मचा-यांची 30 वर्षाची अर्हताकारी सेवा झालेली असल्यास नियुक्ती प्राधिका-यास 03 महिण्याची अगावू नोटीस देवुन सेवेतुन सेवानिवृत्त होता येते,अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक पीईएन-1083/सीआर-1296/83/एसईआर-4 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 01 ऑक्टोबर 1984 च्या शासन निर्णयातील मुद्द क्रमांक 02 मध्ये शासकीय कर्मचा-याला त्यांच्या वयाची 50/55 वर्ष पूर्ण झाल्यावर किंवा त्यांनी 30 वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यावर सेवानिवृत्त केले जाते किंवा अशाच परिस्थितीत जो शासकीय कर्मचारी समुचित प्राधिका-यांस 03 महिण्याची लेखी नोटीस देवुन स्वतःहुन सेवानिवृत्त होतो असा कर्मचारी,तिन महिण्याच्या नोटीसीची मुदत संपण्याच्या तारखेनंतरच्या दिवशी शासकीय सेवेतून निवृत्त होईल अशी तरतुद आहे.

करिता संबंधितांची सेवा 30 वर्षापेक्षा जास्तीची झाली असल्यामुळे उक्त शासन निर्णयानुसार संबंधितांचा अर्ज दिनांक 13.04.2018 रोजी पासुन गृहीत धरुन संबंधितांस दिनांक 11.07.2018 रोजी 03 महिण्यानंतरच्या तारखेनंतरचा दिवशी म्हणजे दिनांक 12.07.2018 रोजी महानगरपालिका सेवेतून उप आयुक्त (विकास) या पदावर स्वेच्छा सेवानिवृत्त मंजूर करणे बाबत महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 45 कलम (2) मध्ये शहर अभियंता, वैद्यकिय अधिकारी, मनपा, मुख्यलेखा परिक्षक, मनपा सचिव, उपआयुक्त, सहाय्यक आयुक्त, असे वैधानिक अधिकारी यांची नेमणुक करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेस अधिकार आहेत. त्यामुळे श्री रत्नाकर कांतराव वाघमारे, उपआयुक्त यांनी दिलेल्या स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यात यावा.

**सभागृह नेता** श्री रत्नाकर वाघमारे उप आयुक्त यांनी स्वेच्छा सेवा निवृतीचा अर्ज दिला आहे. महानगरपालिका ही नियुक्त प्राधिकरण असल्याने त्यांच्या सेवा निवृतीचा विषय सभागृहा समोर आलेला आहे. श्री रत्नाकर वाघमारे उप आयुक्त हे माझे गुरु आहेत असे मी म्हणेन कारण आम्ही नविन नगरसेवक होतो त्यावेळी आम्हाला त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे हे मी विसरु शकत नाही. त्यांचा कार्यकाळ महापालिकेला चांगला गेलेला आहे. या संस्थेला आवश्यकता होती त्यावेळी त्यांनी खुप चांगले काम सुध्दा केले आहे. गुरु-ता-गददीच्या काळात त्यांनी अत्यंत उत्कृष्ठ काम केलेले आहे. काही अबचलनगरचा विषय आला तर त्या विषयाबाबत यांना चांगली माहीती आहे. त्यांच्या इच्छेनुसार त्यांची सेवा निवृती सभागृहाने मंजूर करावी. बरेचे पदे आपल्याकडे रिक्त आहेत. ते सेवा निवृत होईपर्यत हे पद कसे भरता येईल याची कार्यवाही प्रशासनाने करावी. त्यांनी या संस्थेत जे काम केले त्याबददल आम्ही त्यांचे आभारी राहू आणि भावी आयुष्याबाबत त्यांना मी आजच शुभेच्छा देतो.

**दिपकसिंह रावत** श्री रत्नाकर वाघमारे उप आयुक्त यांनी मागील आयुक्तांच्या विनंतीनुसार त्यांनी मनपात एक वर्ष सेवा केली. पुन्हा त्यांनी स्वेच्छा सेवा निवृतीचा अर्ज दिला आहे. श्री वाघमारे, सांहेबांचा सारखा अधिकारी महानगरपालिकेला आवश्यक आहे. नांदेड मध्ये कोणताही ज्वंलत प्रश्न निर्माण झाला की त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय काम करीत नव्हते. असे वाटत होते की महापालिका ही श्री रत्नाकर वाघमारे साहेंबच चालवितो असे होते. आपणास अनुभवी अधिका-याची आवश्यकता आहे. मी वाघमारे साहेंबाना विनंती करतो की, आमच्या नविन आयुक्तांना पुर्ण माहिती होत नाही तो पर्यत आपण मनपाची सेवेत रहावे. आम्ही साहेंबाचा विषय एकमताने पास करतो. जसे आनंद चव्हाण साहेबांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचे पुढील आयुष्य हे सुख समृधीचे जावो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो.

**अ. शमीम अब्दुल्ला** श्री रत्नाकर वाघमारे उप आयुक्त यांनी महापालिकेची सेवा करीत असतांना त्यांनी स्वतःच्या अंगावर घेवून काम करीत होते. कोणताही प्रश्न ते सोडवित होते त्यांची स्तुती करावी तेव्हढी कमी आहे. एक चांगला अधिकारी म्हणुन त्यांची ओळख आहे. मनपाच्या हीताचा जो निर्णय असेल ते निर्णय त्यांनी घेतले आहेत. मी सभागृहास विनंती करतो की, त्यांचा स्वेच्छा सेवा निवृतीचा विषय एक मताने पास करावा व त्यांच्या पुढील आयुष्यास शुभेच्छा व्यक्त करतो.

**आयुक्त** आपणास शासनाकडून उप आयुक्त दर्जाचा अधिकारी मागवावयास सभागृहाने मान्यता दिली तर याच ठरावात समावेश करावा अशी सभागृहास विनंती आहे.

**आनंद चव्हान** मा. आयुक्त महोदयांनी माडलेली सुचना ही ठरावात नमुद करावी.

**सभागृह नेता** सदरचे पद हे प्रतिनियुक्तीचे नसुन महापालिका आस्थापनेवरील आहे. आपल्या आरआर रुल मध्ये जी तरतूद आहे त्यानुसार अथवा पदोन्नतीने हे पद भरण्यात यावे. श्री रत्नाकर कांतराव वाघमारे उपआयुक्त यांनी यापुर्वी दि. 02.05.17 रोजी व नंतर पुन्हा 13.14.18 रोजी स्वेच्दा सेवानिवृत्ती करण्यास विनंती केलेली आहे त्यामुळे सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**महापौर** श्री रत्नाकर कांतराव वाघमारे, उपआयुक्त यांनी यापुर्वी दिनांक 02.05.17 व 13.04.18 रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती करण्यास केलेल्या विनंती अर्जानुसार संबंधीतास स्वेच्छा सेवानिवृत्त करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 45** **ठराव**

श्री रत्नाकर कांतराव वाघमारे, उप आयुक्त या पदावरुन स्वच्छा सेवानिवृत्ती मंजुर करण्याबाबत दि. 13.04.2018 रोजी अर्ज देवून महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1982 मधील नियम 30 (अ) नुसार स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजुर करावी अशी विनंती केलेली आहे.

सदरील अर्जामध्ये संबंधित हे आस्थापनेवर उप आयुक्त या पदावरुन कार्यरत असुन त्यांची मुळ नेमणुक दिनांक 01.04.1983 रोजी झालेली असुन महापालीकेच्या आस्थापनेवर विविध पदावर आजपर्यंत 33 वर्षांची सेवा पूर्ण झालेली आहे महाराष्ट्र नागरिसेवा नियम 1982 मधील नियम 30 (अ) नुसार कोणत्याही शासकीय कर्मचा-यांस अर्हताकारी सेवेची 30 वर्ष सेवा पुर्ण केल्यानंतर नियुक्ती प्राधिकरणास 03 महिणे अगोदर लेखी नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्त घेता येते.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत संबंधिताची सेवा मागिल 33 वर्ष् झालेली असून त्यांनी वैयक्तीक व कौटंबिक कारणास्तव ते दिनांक 01.08.2018 पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त होवु ईच्छीत असल्याचे त्यांनी अर्जात नमुद केले आहे.

संबंधितांच्या मुळ संवापटानुसार त्यांची जन्म दिनांक 20.03.1964 अशी असुन त्यांना आज (54) वर्ष (01) महिना होत आहे. त्यांना दिनांक 01.04.1983 रोजी लिपीक या पदावर सेवेत समाविष्ट करुन घेण्यात आले आहे.

कार्यालयीन आदेश क्र.आस्था-1/3536/06,दिनांक 17.06.2006 अन्वये संबंधितांस सध्याचे वेतन संरक्षित करुन व मागील सेवेचे सातत्य कायम ठेवुन सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 39 दिनांक 24.05.2006 अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार ( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 45 अन्वये सदर पदाची त्यांची नियुक्ती शासनाकडे कायम करण्याच्या अधिन राहुन ) आस्थापनेवरील उप आयुक्त या अभिमानाच्या पदावर वेतनश्रेणी रु.8000-13500 अधिक महागाई भत्ता ईत्यादी मध्ये नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली.सदर नियुक्तीस महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक नांमपा 1306/811/प्र.क्र.236/नवि-24 दिनांक 29 नोंव्हेंबर 2006 अन्वये संबंधितांची दिनांक 17.06.2006 पासूप सरळसेवेने केलेल्या नियुक्तीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनीयम 1949 चे कलम 45(4) अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन ) नियम 1982 चे नियम 65 (1) मध्ये शासकीय कर्मचा-यांची 30 वर्षाची अर्हताकारी सेवा झालेली असल्यास नियुक्ती प्राधिका-यास 03 महिण्याची अगावू नोटीस देवुन सेवेतुन सेवानिवृत्त होता येते,अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक पीईएन-1083/सीआर-1296/83/एसईआर-4 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 01 ऑक्टोबर 1984 च्या शासन निर्णयातील मुद्य क्रमांक 02 मध्ये शासकीय कर्मचा-याला त्यांच्या वयाची 50/55 वर्ष पूर्ण झाल्यावर किंवा त्यांनी 30 वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यावर सेवानिवृत्त केले जाते किंवा अशाच परिस्थितीत जो शासकीय कर्मचारी समुचित प्राधिका-यांस 03 महिण्याची लेखी नोटीस देवुन स्वतःहुन सेवानिवृत्त होतो असा कर्मचारी,तिन महिण्याच्या नोटीसीची मुदत संपण्याच्या तारखेनंतरच्या दिवशी शासकीय सेवेतून निवृत्त होईल अशी तरतुद आहे.

करिता संबंधितांची सेवा 30 वर्षापेक्षा जास्तीची झाली असल्यामुळे उक्त शासन निर्णयानुसार संबंधितांचा अर्ज दिनांक 13.04.2018 रोजी पासुन गृहीत धरुन संबंधितांस दिनांक 11.07.2018 रोजी 03 महिण्यानंतरच्या तारखेनंतरचा दिवशी म्हणजे दिनांक 12.07.2018 रोजी महानगरपालिका सेवेतून उप आयुक्त (विकास) या पदावर स्वेच्छा सेवानिवृत्त मंजूर करणे बाबत महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे नियम 45 कलम (2) मध्ये शहर अभियंता, वैद्यकिय अधिकारी, मनपा , मुख्यलेखा परिक्षक, मनपा सचिव, उपआयुक्त, सहाय्यक आयुक्त, असे वैधानिक अधिकारी यांची नेमणुक करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेस अधिकार आहेत. त्यामुळे श्री रत्नाकर कांतराव वाघमारे, उपआयुक्त यांनी यापुर्वी दिनांक 02.05.17 व 13.04.18 रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती करण्यास केलेल्या विनंती अर्जानुसार संबंधीतास स्वेच्छा सेवानिवृत्त करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्रं.07**

**विषय :- लोकशाही अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नावाशमनपा हद्यीत प्रस्तावित कामांची निवड निश्चीती करुन देणे बाबत**

**संदर्भ :-** 1) मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र जा.क्रं. 2018/नपाप्र/का-1/टे-4/प्र.क्र. दिनांक 19.04.2018

2) मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र जा.क्रं. 2018/नपाप्र/का-1/टे-4/प्र.क्र. दिनांक 19.11.2018

3) मनपा सर्वसाधारण सभा दिनांक 19.12.2017 रोजीच्या सभेत समंत करण्यात आलेला ठराव क्रं. 66

4) या कार्यालयाचे पत्र क्रं. नावाशमनपा/साबांवि/16253/2018 दिनांक 31.01.2018

5) या कार्यालयाचे पत्र क्रं. नावाशमनपा/साबांवि/17141/2018 दिनांक 16.02.2018

मा. पालकमंत्री महोदय यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस सालसन 2017-2018 मधील एकुण रुपये 1583.52 लक्ष च्या एकुण 70 विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत असल्याने संदर्भीय पत्र क्र.1 अन्वये कळवीले आहे.

मा. पालकमंत्री महोदय यांनी मान्यता दिलेल्या 70 कामापैकी 49 कामांना संदर्भ क्र.3 च्या ठरावा अन्वये मान्यता दिलेली आहे. उर्वरीत 21 कामे ठरावामध्ये नमुद नसल्याचे व समाज कल्याण अधिकारी यांचा स्थळ पाहणी अहवालही परीपुर्ण प्रस्ताव सादर करण्यासाठी संदर्भ क्रं1 च्या पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी,नांदेड यांनी कळविले आहे.

करीता मा.जिल्हाधीकारी नांदेड यांचे संदर्भीय पत्र क्र. 1 नुसार मा. पालकमंत्री महोदय यांनी मान्यता दिलेल्या 70 कामामध्ये अ.क्र. 36 ते 68 वरील काम एकच असल्याने अ.क. 68 वरील काम वगळण्यात येवुन अ.क्र. 48 ते 67 वरील खाली दर्शविल्या प्रमाणे एकुण 20 कामांची निवड निश्चीती करुन देणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | यादीतील क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत लक्षात |
|---|---|---|---|
| 1 | 48 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.1 मध्ये बेलानगर भागात समाज मंदिराचे बांधकाम करणे | 50.00 |
| 2 | 49 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.1 मध्ये सुमेध नगर भागात बोध्द विहारचे सुशोभिकरण करणे | 10.00 |
| 3 | 50 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.1 मध्ये बोधीसत्व नगर भागात सभागृहाचे सुशोभिकरण करणे व बांधकाम करणे | 15.00 |
| 4 | 51 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.2 मध्ये वैशाली नगर भागात समाज मंदिराचे बांधकाम करणे | 20.00 |
| 5 | 52 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 मध्ये जुनी सांगवी भागात समाज मंदिराचे बांधकाम करणे. | 20.00 |
| 6 | 53 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 मध्ये अनुसया/धम्म ज्योतीनगर भागात समाज मंदिराचे बांधकाम करणे | 20.00 |
| 7 | 54 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 मध्ये सिध्दार्थ नगर भागात समाज मंदिर अभ्यासिकेचे बांधकाम करणे | 20.00 |
| 8 | 55 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 मध्ये विठठल नगर भागात अण्णभाऊ साठे समाज मंदिराच्या जागेत अभ्यासिका बांधकाम करणे | 15.00 |
| 9 | 56 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 मध्ये म्हाळजा (माळटेकडी) या ठिकाणी अण्णाभाऊ साठे समाज मंदिर संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे | 25.00 |
| 10 | 57 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 मध्ये लक्ष्मीनगर रत्नेश्वरी नगर भागात अण्णाभाऊ साठे समाज मंदिर व डॉ.बाबासाहेब समाज मंदिराचे बांधकाम करणे. | 10.00 |
| 11 | 58 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.6 मध्ये प्रभातनगर भागात अभ्यासिकेची दुरुस्ती करणे | 50.00 |
| 12 | 59 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.6 मध्ये समतानगर बौध्द विहारासमोर सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम करणे | 30.00 |
| 13 | 60 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.9 ईश्वरनगर भागात समाज मंदिर बांधकाम करणे | 15.00 |
| 14 | 61 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.9 मध्ये खोब्रागडेनगर भागात नविन समाज मंदिर बांधकाम करणे | 29.00 |
| 15 | 62 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.9 मध्ये मगणपुरा झोपडपटटी येथील समाज मंदिराचे दुरुस्तीचे काम करणे. | 10.00 |
| 16 | 63 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 (सांगवी) विठठल रुख्मीनी नगर ते लाईटच्या डि पी पर्यंत व कुटे यांचे घर ते विमानतळ सि.सी.रस्ता व नाला करणे. | 15.00 |
| 17 | 64 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 (सांगवी) शिवनेरी नगर हुबे यांचे घर ते भवरे यांच्या घरापर्यंत सी.सी.रस्ता व नाला करणे. | 10.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | 65 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 (सांगवी) शिवनेरी नगर सुभाष बुक्तरे यांचे घर ते माधव खिराडे यांचे घरापर्यंत सी.सी.रस्ता व नाला करणे. | 10.00 |
| 19 | 66 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 (सांगवी) अंबानगर, अनुसयानगर केसर खिराडे यांचे घर ते दवणे यांच्या घरापर्यंत व पुढे चंद्रशेखर वाघमारे यांचे घर ते नामदेव कांबळे यांचे घरापर्यंत तसेच पुढे मारोती मंदिरापर्यत सि.सी.रस्ताव नाला करणे. | 50.00 |
| 20 | 67 | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नांगरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांवशमनपा हद्दीत प्र.क्र.3 (सांगवी), शिवनेरी नगर,सिध्दार्थ नगर,विठठल रुख्मीनी नगर, अंबानगर, म्हाळजा टेकडी, त्रिरत्न नगर, रेणुकानगर, जुनी सांगवी, इंदिरानगर येथे एल.ई.डी.लाईट पोलचे काम करणे. | 30.00 |

**उमेश चव्हाण** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा प्रस्ताव यापुर्वी आपण मा. जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविला होता तोच प्रस्ताव असेल तर यात कोणतीही सुधारणा करु नये कारण आपण घेतलेला निर्णय हा प्रशासनाने स्वत: स्थळ पहाणी करुन घेतलेला निर्णय आहे. यात नगरसेवकाच्या शिफारशीचे कामे नाहीत. मा. पालकमंत्री यांनी स्थळ पहाणी करुन त्यांचे कामे प्रस्तावित करावे. त्यास ही आम्ही मंजूरी देवू. माझा प्रभागात जयभीम नगर हा एरीया आहे हा 100 टक्के दलीत वस्तीचा एरीया आहे जर यातील कामे रदद केली तर आम्ही घेराव घालू. आमची कामे रदद होवू नये.

**गोंधळ चालू होता.**

**बालाजी कल्याणकर** मा.पालकमंत्री महोदयांना अधिकार आहेत ते कामे प्रस्तावित करु शकतात. मा. पालकमंत्री यांना दोषी धरु नये.

**सोडी गुरप्रीतकौर** आमच्या पक्षाच्या नगरसेविका गुपीले मॅडम, गोरे मॅडम यांच्याही प्रभागात दलीत बांधव राहत आहेत त्यांच्याही वसाहतीची कामाचा समावेश करण्यात यावा. मा.पालकमंत्री हे सर्व नांदेड जिल्हयाचे आहेत. दक्षिण नांदेडचा त्यांनी भेदभाव केला आहे त्यांनी दक्षीण नांदेडमधील कामाचा त्यांनी समावेश केलेला नाही. त्यांनी नांदेडच्या दक्षीण भागाचा समावेश नसल्याने पालकमंत्री यांचा निषेध व्यक्त करते.

**दिपकसिंह रावत** पालकमंत्री हे एजन्सी निश्चीत करु शकतात किंवा रदद करण्याचा अधिकार हा त्यांचा आहे. त्यांना कामे सुचवण्याचा अधिकार नाही. दक्षीण नांदेड मध्ये विविध पक्षाचे नगरसेवक निवडून आलेले आहेत. प्रत्येक प्रभागात आमचे दलीत बांधव राहतात. मला म्हणायचे की उत्तरवरच का त्यांचे प्रेम आहे हे कळत नाही. कायदयाने फक्त सर्वसाधारण सभेलाच अधिकार आहेत. माझ्या एरीयातही दलीत बांधव आहेत. त्यांच्या एरीयाचा विकास झाला पाहीजे. मुळ आपण दिलेला ठरावच कायम ठेवण्यात यावा. मी बीजेपीचा नगरसेवक जरी असलो तरी विकास करावयाचा असल्याने मी आपल्या सोबत आहे.

**सौ. गुपीले** प्रभाग क्रमांक 19 व 20 या भागातील तत्कालीन आयुक्त यांनी सिडकोतील वसंतराव नाईक कॉलेज ते रमामाता चौक व संभाजी चौक ते विदयादान कोचींग क्लासेस पर्यतचा रस्ता इतरही कामाचा समावेश करण्यात आला होता. मा.पालकमंत्री महोदयांनी यातील काही कामे रदद केलेली आहेत. ही कामे पुर्ववत ठेवण्यात यावी. एनडी -120 हा सखल भाग असल्यामुळे लोकांच्या घरात पाणी जाते या पाण्याचाही बंदोबस्त करावा.

**फारुख अली खान** दलीत वस्तीच्या निधी अंतर्गत दलीत वस्तीत कामे झाले पाहीजे. परंतू काही विशिष्ठ वार्डातच कामे का दिली जातात. सर्वच नगरसेवकाच्या वार्डातील कामासाठी हा निधी वापरण्यात यावा. आमच्याही वार्डात दलीत बांधव राहतात त्याच्या प्रमाणात निधी वितरीत करावा. आमच्या एरीयाला नजर अंदाज केले जाते.याचे काय कारण आहे याचा खुलासा करावा. आपल्या वार्डातील कामे होवून जातील असे अधिकारी म्हणतात पण कामे काही करत नाहीत.

**बालाजी कल्याणकर** दलित वस्तीच्या कामाचा विषय पास करीत आहात किंवा नाही याचा खुलासा करावा.

**अब्दुल सत्तार** सभागृहाने कामाची यादी अंतिम करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविली आहे. यात सभागृहाचा जो अधिकार आहे ते काम सभागृहाने केले आहे.पालकमंत्री महोदयांना फेरबदल करण्याचे अधिकार नाहीत. एजन्सी नियुक्तीचा केवळ त्यांना आहे. यापुर्वी यादी सभागृहाने मान्यता दिली तीच यादी जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवावी.

**गोंधळ सुरु होता.**

**अ. शमीम अब्दुल्ला** सभागृहाने यादी मंजूर करुन दिलेली आहे. त्यामुळे मा. पालकमंत्री यांना ती बदण्याचा अधिकार नाही त्यांना एजन्सी नियुक्त करण्याचा अधिकार आहे. त्यांनी काही नगरसेवकाच्या सांगण्यावरुन कामाचा समावेश केलेला आहे. हे योग्य नाही. इतर निधीतुन त्यांनी कामे प्रस्तावित करावीत त्यास आम्ही मान्यता देवू.मा. आयुक्त, कार्यकारी अभियंता, समाजकल्याणचे अधिकारी यांनी पाहणी करुन कामे निश्चीत केली आहेत. पावसाळयापुर्वी ही कामे पुर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. 100 कोटीचे कामे शहरासाठी त्यांनी आणावे त्यास आम्ही मान्यता देण्यात येईल.

**बालाजी कल्याणकर** मा. पालकमंत्री यांनी दिलेली कामे या सभागृहात मान्य करावी. हा ठराव पास करावा.

**उप महापौर** कामे अंतिम करण्याचा अधिकार हा सर्व साधारण सभेचा आहे सभागृह जे निर्णय घेईल ते योग्य राहील.

**पुन्हा गोंधळ सुरु झाला.**

**सभागृह नेता** आपण जी यादी पाठविली त्यास मान्यता आहे किंवा नाही याचा खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता साबांवि** जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जे पत्र प्राप्त झाले आहे त्या पत्रानुसार मान्यता आहे असे दिसत नाही. यास समितीची मान्यता आवश्यक आहे. केवळ पालममंत्री महोदयांनी मान्यता दिल्याचे दिसुन येते.

**उप आयुक्त (विकास)** आपण एकुण 64 कामाची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविली. कमीटीचे प्रमुख हे पालकमंत्री आहेत त्यामुळे मा. जिल्हाधिकारी नांदेड यांनी मा. पालकमंत्री यांच्या कडे पाठविली असता आपल्या 64 कामामध्ये इतर कामाचा समावेश करुन 69 कामाना मान्यता दिलेली आहे. यात जुन्या यादीतील 49 कामाचा समावेश आहे. 20 कामे प्रस्तावित केलेल्या त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता नाही. त्यामुळे त्या कामास मान्यतेकरीता सर्वसाधारण सभे समोर प्रस्ताव आलेला आहे. 49 कामाना मा. पालकमंत्री महोदयांनी मान्यता दिली असली तर पण समितीची या कामास मान्यता नाही.

**सभागृह नेता** आम्ही जी यादी पाठविली आहे त्यास मान्यता नाही ती कामे का वगळण्यात याचा या पत्रात काही खुलासा केलेला दिसुन येत नाही.

**आयुक्त** मा. पालकमंत्री यांच्या पत्रात प्रशासकिय मान्यता दिसते परंतू समितीची बैठक झाली नाही त्यामुळे मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

**सभागृह नेता** जी कामे कमी झालेत ती का कमी झालीत याबाबत काही पुरावा आहे काय ते सांगावे. आम्ही जी 15 कोटी 66 लक्षाची कामे पाठविली आहेत तयावर अदयाप निर्णय झाला नाही. जी कामे सांगीतले ते सोडून इतर कामे प्रस्तावित केली आहेत तया शिर्षकाखाली मनपाकडे निधी शिल्लक आहे का याचा खुलासा करावा. आम्ही जी कामे प्रस्तावित केली आहे ती कामे पुर्ण करण्यास आम्ही ठाम आहोत. मंत्री महोदयांनी जी कामे प्रस्तावित केली आहे त्यास निधी नसल्याने ती कामे आता हाती घेता येणार नाहीत तथापी यात मा. महापौर व उप महापौर यांनी मा. पालकमंत्री यांच्यासोबत चर्चा करावी व प्रश्न निकाली काढावा.

**उप महापौर** आता सभागृहात जो विषय झाला त्यानुसार कायदयाने आपण परीपुर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला आहे. समीतीचे अध्यक्ष हे मा. पालकमंत्री असल्याने त्यांनी आपण पाठविलेली कामे रदद करुन त्यांनी नव्याने कामे सुचविली हे कायदयाच्या चौकटीत बसत नाही कारण काम अंतिम करण्याचा अधिकार हा महासभेचा आहे. मी स्वतः मा. महापौर, आयुक्त साहेब आम्ही तीघेही मा. पालकमंत्री यांच्याकडे जावून या विषयावर चर्चा करुन हा प्रश्न निकाली काढू.

**बालाजी कल्याणकर** या प्रकरणात मा. महापौरांनी खुलासा करावा अशी त्यांना मी विंनती करतो. खुलासा हा उप महापौरांनी केला आहे.

**उप महापौर** पालक मंत्री यांनी कामे रदद केल्याबाबत खुलासा केलेला नाही त्यामुळे महापौर हे खुलासा करणार नाहीत.

**गोंधळ सुरु झाला.**

**महापौर** सर्व स. सदस्यांचा भावना लक्षात घेता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत विविध प्रभागात विकासाचे कामे करण्यासाठी यापुर्वी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 66 दिनांक 19.12.2017 अन्वये एकूण रुपये 15.66 लक्षाच्या कामास प्रशासकिय मान्यता देवुन मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे सादर करुन निधीचे उपलब्धतेनुसार मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार प्रशासनाने सादर केलेल्या 20 कामा ऐवजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत विविध प्रभागात विकासाचे कामे करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 66 दिनांक 19.12.2017 मधील दर्शविलेलेचे कामे करण्यास मान्यता देण्यात आली होती त्यानुसार प्रशासनाने पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच प्रशासनाने पुन्हा दिनांक 19.12.2017 रोजी पारीत केलेल्या ठरावातील नमुद कामा ऐवजी नविन 20 दुसरे कामे प्रस्तावित केले असुन सदरचे 20 कामांना शासना मार्फत निधी उपलब्ध नाही त्यामुळे सदर कामांसाठी निधी प्राप्त करण्यासाठी मा. पालकमंत्री यांच्या सोबत चर्चा करण्यासाठी मा. महापौर, उपमहापौर, सभागृहनेता यांनी चर्चा करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. 46** **ठराव**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत विविध प्रभागात विकासाचे कामे करण्यासाठी यापुर्वी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 66 दिनांक 19.12.2017 अन्वये एकूण रुपये 15.66 लक्षाच्या कामास प्रशासकिय मान्यता देवुन मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडे सादर करुन निधीचे उपलब्धतेनुसार मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार प्रशासनाने सादर केलेल्या 20 कामा ऐवजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत विविध प्रभागात विकासाचे कामे करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 66 दिनांक 19.12.2017 मधील दर्शविलेलेचे कामे करण्यास मान्यता देण्यात आली होती त्यानुसार प्रशासनाने पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच प्रशासनाने पुन्हा दिनांक 19.12.2017 रोजी पारीत केलेल्या ठरावातील नमुद कामा ऐवजी नविन 20 दुसरे कामे प्रस्तावित केले असुन सदरचे 20 कामांना शासना मार्फत निधी उपलब्ध नाही त्यामुळे सदर कामांसाठी निधी प्राप्त करण्यासाठी मा. पालकमंत्री यांच्या सोबत चर्चा करण्यासाठी मा. महापौर, उपमहापौर, सभागृहनेता यांनी चर्चा करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**पुरवणी विषय पत्रिका**

## विषय क्रं.01

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यी अंतर्गत माहे एप्रील 2018 महिण्याचे लिंग गुणोत्तर संबंधीत नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | महिना | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणोत्तर प्रति हजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| 01 | एप्रील 2018 | 862 | 746 | 1608 | 865.42 |

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. 47** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यी अंतर्गत माहे एप्रील 2018 महिण्याचे लिंग गुणोत्तर संबंधीत नोंद हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

| अ.क्र. | महिना | एकूण जन्म | | एकूण | लिंग गुणोत्तर प्रति हजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| 01 | एप्रील 2018 | 862 | 746 | 1608 | 865.42 |

**विषय क्रं. 02**

**विषय :- बृहमुंबई महानगरपालिकेतुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती करणे बाबत**

श्री चंद्रकांत दत्तात्रय घोलप, सुरक्षा रक्षक, बृहमुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी दिनांक 26.10.2017 रोजी अर्ज सादर करुन संबंधीत हे दिनांक 28.07.2014 पासुन बृहमुंबई महानगरपालिकेत कार्यरत आहेत संबंधीत हे मुळ नांदेडचे रहिवाशी असुन त्यांचे सर्व कुटूंब नांदेड येथेच कायम स्वरुपी वास्तव्यास आहेत, त्यांचे आई व वडीलांना एकुलता एका मुलगा असल्याचे संबंधीतांनी नपमुद केले आहे.

संबंधीत अर्जदाराचे वडील श्री दत्तात्रय सिताराम घोलप हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत होते ते नियत वयोमानानुसार दिनांक 31.03.2016 रोजी मनपा सेवेतुन सेवानिवृत्त झालेले आहेत.

सध्या अर्जदाराचे कुटूंबात आई, वडील व अर्जदार असा परिसर असुन त्यांना नौकरी निमित्त मुंबई येथे राहावे लागत आहे. अर्जदाराचे आई व वडील हे दोघेच नांदेड येथे राहतात आई व वडीलांचे वय झाले असुन ते वृध्दापकाळाने वेळोवेळी आजारी पडतात त्यांची देखभाल व औषाधोपचार वेळेवर देणे हे त्यांचे कर्तव्य असुन सुध्दा ते फार दुर मुंबई येथे राहत आहेत.

यापूर्वी सुध्दा मुंबई महानगरपालिकेतुन समावेतन वेतनश्रेणी वरुन श्री बोंगाणे हे कर्मचारी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत रुजु झालेले आहेत.

त्यास्तव अर्जदार हे बृहमुंबई मानगरपालिकेत सुरक्षा रक्षक या पदावर वेतनश्रेणी रुपये 5200-20200 ग्रेडपे 1900 या वेतनश्रेणीत कायमस्वरुपी कार्यरत आहेत. सध्या नांदेड महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक हे पद अस्तित्वात नाही. परंतु वेतनश्रेणी रुपये 5200-20200 ग्रेडपे 1900 मध्ये नांदेड महानगरपालिका आस्थापनेवर रिक्त असलेल्या पदावर संबंधीतास समान वेतनश्रेणीतील लिपीक, फायरमन, लिडींग फायरन, बिल कलेक्टर किंवा शिपाई, बुक बेअरर, वार्ड बॉय इत्यादी कोणत्याही रिक्त पदावर समावून घेण्यासाठी नियमानुसार महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवुन त्यास मान्यता प्राप्त करुन त्यांना नांदेड महानगरपालिकेत सामावुन घेणे बाबत ठराव पारीत केल्यास शासनास मंजुरीस्तव पाठविण्याकरिता सोयीस्कर होईल असे अर्जदारानी नमुद केले आहे.

उक्त सर्व बाबींचा विचार करुन त्यांचे वृध्द आई वडीलांचा वृध्दपकाळात सेवा करण्याची संधी आपण या माध्यमातुन त्यांना उपलब्ध करुन देवु शकता शिवाय एक सहानुभूती म्हणुन त्यांचे वडीलांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत निश्चार्थपणे केलेल्या सेवेचा विचार करुन त्यांची सेवा प्रत्यार्पण करुन त्यांच्यावर व त्यांच्या कुटूंबावर उपकार करावेत अशी विनंती संबंधीतानी केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम 2008 मधील कलम (6) अन्वये एका महानगरपालिकेतून दुस-या महानगरपालिकेत बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनियमातील तरतूदीनुसार व दोनही महानगरपालिकेतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर समंतीने मान्य होतील अशा अटी व शर्तीवर खालील बाबींचा अधिन राहुन बदलीने नियुक्ती देता येईल.

1) पदोन्नतीने भरण्या येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करिता राखून ठेवण्यात आलेल्या रिकत पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.
2) अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकांची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (झिरो सिनियारिटी) राहील.

तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 22 क्रं. नप्रसई-स्थायी निर्देश/2003/प्रक्र.365/5 दिनांक 20 मे 2004 मधील निर्देश विचारात घेता.

वास्तविक पाहता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर सुरक्षा रक्षक या अभिनामाचे पद अस्तित्वात नाही. बृहमुंबई महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक हे पद वेतनश्रेणी रुपय 5200-20200 ग्रेडपे 1900 यामध्ये मंजुर आहे परंतु अर्जदारानी मनपा आसथापनेवरील वर्ग-4 संवर्गातील कोणत्याही पदावर सामावून घेण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यातस्तव संबंधीतास मनपा आस्थापनेवरील वर्ग-4 संवर्गातील चौकीदार या पदावर सामावुन घेता येईल.

उक्त धिनियमातील तरतुद तसेच अर्जदाराने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सर्व विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 53 मधील तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकर म्हणुन सर्व प्रथम प्रस्तुत प्रकरणी महासभेची मान्यता होणे आवश्यक असल्याने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत बृहमुंबई महानगरपालिकेतील री चंद्रकांत दत्तात्रय घोलप सुरक्षा रक्षक यांना बदलीने नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर निर्णयास्तव सादर.

**महापौर** श्री चंद्रकांत दत्तात्रय घोलप, सुरुक्षा रक्षक, बृहमुंबई महानगरपालिका, मुंबई यांना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत शासनाची मान्यता घेवुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील चौकीदार या पदावर बदलीने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 48** **ठराव**

**विषय :- <u>बृहमुंबई महानगरपालिकेतुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती करणे बाबत</u>**

ब यांनी दिनांक 26.10.2017 रोजी अर्ज सादर करुन संबंधीत हे दिनांक 28.07.2014 पासुन बृहमुंबई महानगरपालिकेत कार्यरत आहेत संबंधीत हे मुळ नांदेडचे रहिवाशी असुन त्यांचे सर्व कुटूंब नांदेड येथेच कायम स्वरुपी वास्तव्यास आहेत, त्यांचे आई व वडीलांना एकुलता एका मुलगा असल्याचे संबंधीतांनी नपमुद केले आहे.

संबंधीत अर्जदाराचे वडील श्री दत्तात्रय सिताराम घोलप हे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत होते ते नियत वयोमानानुसार दिनांक 31.03.2016 रोजी मनपा सेवेतुन सेवानिवृत्त झालेले आहेत.

सध्या अर्जदाराचे कुटूंबात आई, वडील व अर्जदार असा परिसर असुन त्यांना नौकरी निमित्त मुंबई येथे राहावे लागत आहे. अर्जदाराचे आई व वडील हे दोघेच नांदेड येथे राहतात आई व वडीलांचे वय झाले असुन ते वृध्दापकाळाने वेळोवेळी आजारी पडतात त्यांची देखभाल व औषाधोपचार वेळेवर देणे हे त्यांचे कर्तव्य असुन सुध्दा ते फार दुर मुंबई येथे राहत आहेत.

यापूर्वी सुध्दा मुंबई महानगरपालिकेतुन समावेतन वेतनश्रेणी वरुन श्री बोंगाणे हे कर्मचारी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत रुजु झालेले आहेत.

त्यास्तव अर्जदार हे बृहमुंबई मानगरपालिकेत सुरक्षा रक्षक या पदावर वेतनश्रेणी रुपये 5200-20200 ग्रेडपे 1900 या वेतनश्रेणीत कायमस्वरुपी कार्यरत आहेत. सध्या नांदेड महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक हे पद अस्तित्वात नाही. परंतु वेतनश्रेणी रुपये 5200-20200 ग्रेडपे 1900 मध्ये नांदेड महानगरपालिका आस्थापनेवर रिक्त असलेल्या पदावर संबंधीतास समान वेतनश्रेणीतील लिपीक, फायरमन, लिडींग फायरमन, बिल कलेक्टर किंवा शिपाई, बुक बेअरर, वार्ड बॉय इत्यादी कोणत्याही रिक्त

पदावर समावून घेण्यासाठी नियमानुसार महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवुन त्यास मान्यता प्राप्त करुन त्यांना नांदेड महानगरपालिकेत सामावुन घेणे बाबत ठराव पारीत केल्यास शासनास मंजुरीस्तव पाठविण्याकरिता सोयीस्कर होईल असे अर्जदारानी नमुद केले आहे.

उक्त सर्व बाबींचा विचार करुन त्यांचे वृध्द आई वडीलांचा वृध्दपकाळात सेवा करण्याची संधी आपण या माध्यमातुन त्यांना उपलब्ध करुन देवु शकता शिवाय एक सहानुभूती म्हणुन त्यांचे वडीलांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत निश्चार्थपणे केलेल्या सेवेचा विचार करुन त्यांची सेवा प्रत्यार्पण करुन त्यांच्यावर व त्यांच्या कुटूंबावर उपकार करावेत अशी विनंती संबंधीतानी केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम 2008 मधील कलम (6) अन्वये एका महानगरपालिकेतून दुस-या महानगरपालिकेत बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनियमातील तरतूदीनुसार व दोनही महानगरपालिकेतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर समतीने मान्य होतील अशा अटी व शर्तीवर खालील बाबींचा अधिन राहुन बदलीने नियुक्ती देता येईल.

1) पदोन्नतीने भरण्या येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करिता राखून ठेवण्यात आलेल्या रिकत पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.
2) अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकांची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (झिरो सिनियारिटी) राहील.

तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश क्रं. 22 क्रं. नप्रसई-स्थायी निर्देश/2003/प्रक्र.365/5 दिनांक 20 मे 2004 मधील निर्देश विचारात घेता.

वास्तविक पाहता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर सुरक्षा रक्षक या अभिनामाचे पद अस्तित्वात नाही. बृहमुंबई महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक हे पद वेतनश्रेणी रुपय 5200-20200 ग्रेडपे 1900 यामध्ये मंजुर आहे परंतु अर्जदारानी मनपा आसथापनेवरील वर्ग-4 संवर्गातील कोणत्याही पदावर सामावून घेण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यातस्तव संबंधीतास मनपा आस्थापनेवरील वर्ग-4 संवर्गातील चौकीदार या पदावर सामावुन घेता येईल.

श्री चंद्रकांत दत्तात्रय घोलप, सुरुक्षा रक्षक, बृहमुंबई महानगरपालिका, मुंबई यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार शासनाची मान्यता घेवुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत चौकीदार या पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 53 मधील तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकरण म्हणुन वरील अटी व शर्तीनुसार बदलीने नियुक्ती करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.03**

महानगरपालिका हद्यीत दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान ( DAY-NULM ) अंतर्गत नागरी बेघरासाठी निवारागृह उभारणे या घटकांतर्गत बेघर व्यक्तीसाठी निवारागृह बांधणे असे उद्दिष्टये निर्गमीत करण्यात आलेले आहे.सदर घटकाची अंमलबजावणी करण्याकरीता यापुर्वी महानगरपालिकेच्या 27 फेब्रुवारी 2017 च्या सर्वसाधारण सभेने संमत केलेला ठराव क्र.133 अन्वये रु.79,90,000/-(अक्षरी एकोनअंशी लक्ष नव्वद हजार केवळ ) मान्यता प्रदान केलेली आहे. परंतु सदयृस्थितीत राज्यदर सुची 2017-18 चे दर प्रचलित आहेत. त्यानुसार निवारागृत टेबल,खुर्ची,पलंग,गादी,कपाट,गॅस शेगडी, CC TV कॅमेरा संच,सौर उर्जा उपकरणे इ.साहित्य असावे असे निर्देश आहेत.त्यामुळे निवारागृहाच्या खर्चात अतीरिक्त आढ होत आहे.

सबब सदरील निवारागृहाच्या खर्चासाठी यापुर्वी सर्वसाधारण सभेने मंजुर केलेले. रु.79,90,000/- व वाढीव खर्च रु. 56,00,000/-(अक्षरी छपन लक्ष केवळ ) असा आहे.निवारागृहाचा खर्च एकुण रु. 1,35,90,000/-( अक्षरी एक कोटी पसत्तीस लक्ष नव्वद हजार केवळ ) एवढा होत आहे.

करीता उपरोक्त निवारागृहासाठी राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत निधी प्राप्त होणार असून सदर काम करण्याकरिता व सविस्तर प्रकल्प अहवाल नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यासाठी मनपा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्त्व सादर.

**महापौर** प्रशासनाचा प्रसताव मंजुर करण्यता येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 49** **ठराव**

महानगरपालिका हद्यीत दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान ( DAY-NULM ) अंतर्गत नागरी बेघरासाठी निवारागृह उभारणे या घटकांतर्गत बेघर व्यक्तीसाठी निवारागृह बांधणे असे उद्दिष्टये निर्गमीत करण्यात आलेले आहे.सदर घटकाची अंमलबजावणी करण्याकरीता यापुर्वी महानगरपालिकेच्या 27 फेब्रुवारी 2017 च्या सर्वसाधारण सभेने संमत केलेला ठराव क्र.133 अन्वये रु.79,90,000/-(अक्षरी एकोनअंशी लक्ष नव्वद हजार केवळ ) मान्यता प्रदान केलेली आहे. परंतु सदयृस्थितीत राज्यदर सुची 2017-18 चे दर प्रचलित आहेत. त्यानुसार निवारागृत टेबल,खुर्ची,पलंग,गादी,कपाट,गॅस शेगडी, CC TV कॅमेरा संच,सौर उर्जा उपकरणे इ.साहित्य असावे असे निर्देश आहेत.त्यामुळे निवारागृहाच्या खर्चात अतीरिक्त आढ होत आहे.

सबब सदरील निवारागृहाच्या खर्चासाठी यापुर्वी सर्वसाधारण सभेने मंजुर केलेले रु. 79,90,000/- व वाढीव खर्च रु. 56,00,000/-(अक्षरी छपन लक्ष केवळ ) असा आहे.निवारागृहाचा खर्च एकुण रु. 1,35,90,000/-( अक्षरी एक कोटी पसत्तीस लक्ष नव्वद हजार केवळ ) एवढा होत आहे.

करीता उपरोक्त निवारागृहासाठी राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत निधी प्राप्त होणार असून सदर काम करण्याकरिता व सविस्तर प्रकल्प अहवाल नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.04** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत देगलुर नाका भागात जड वाहनांमुळे ट्रॉफिकचा नेहमी प्रश्न उध्दवत आहे हया जड वाहनामुळे नेहमी अपघात होऊन नागरीकांचे जीव जातात नागरीकांच्या जिवाच्या दृष्टीकोणातुन माळटेकडी रेल्वे गोदामावरुन रस्ता क्रमांक 24 वरुन येऊन बरकत कॉम्पलेक्स ते जुना पुल मार्गे मालवाहतुक होत आहे जास्त ट्रीप मारण्यासाठी जड वाहने अत्यंत वेगाने जात असल्याने अनेक अपघात झाले आहे.

करिता माळटेकडी रेल्वे गोडाऊनकडून येणारी जड वाहने रस्ता क्रं. 24 वर येण्यास बंदी घालणे करिता या ठिकाणी लोखंडी बॅरेगेटींग टाकण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**सुचक** :- स. शेर अली स. महेबुब अली **अनुमोदक** :- तेहरा अमितसिंह

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 50** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत देगलुर नाका भागात जड वाहनांमुळे ट्रॉफिकचा नेहमी प्रश्न उध्दवत आहे हया जड वाहनामुळे नेहमी अपघात होऊन नागरीकांचे जीव जातात नागरीकांच्या जिवाच्या दृष्टीकोणातुन माळटेकडी रेल्वे गोदामावरुन रस्ता क्रमांक 24 वरुन येऊन बरकत कॉम्पलेक्स ते जुना पुल मार्गे मालवाहतुक होत आहे जास्त ट्रीप मारण्यासाठी जड वाहने अत्यंत वेगाने जात असल्याने अनेक अपघात झाले आहे.

करिता माळटेकडी रेल्वे गोडाऊनकडून येणारी जड वाहने रस्ता क्रं. 24 वर येण्यास बंदी घालणे करिता या ठिकाणी लोखंडी बॅरेगेटींग टाकण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 05** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत जुना नांदेड शहरातील ईदगाहला लागुन कब्रस्तान असल्याने व नदीवरील एक कोल्हापुरी बंधारा बांधण्यात आलेला असुन त्यामुळे नदीचा पाणी थांबविण्यात येत आहे. तसेच इदगाह समोरील एक दर्गाह असुन त्या ठिकाणी धार्मीक कार्यक्रम होत असतात त्या ठिकाणी नागरीकांना हातपाय धोण्यासाठी नदी जाण्यास अत्यंत त्रास होत आहे त्या करिता इदगाह समोरील नदीघाटाचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे तसेच ईदगाहच्या पाठीमागुन एक नाला वाहत असल्याने सदरील नाला हे हायवे व जुना पालाच्या जवळुन वाहत असल्याने भविष्यात भिंत कोसळण्याची दाट शक्यता असल्याने सदरचा नाला रोड पासुन 200 ते 300 मिटर सोडून आर.सी.सी. नाला नदीच्या कोपत्या पर्यंत बांधणे व ईदगाह समोरील नदी घाटाचे सुशोभिकरण करण्यासाठीचे हे काम नाविन्यपुर्व योजने अंतर्गत करण्यासाठी लागणा-या खर्चास निधी हे जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त करुन घेण्यासाठी शिफारस करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- अरशीया कौसर मोहम्मद हबीब **अनुमोदक** :- शमीम बेगम शेख जावीद

**अरशीया कौसर** या ठिकाणी धार्मीक स्थळ असल्याने या घाटाचा विकास करणे अंत्यत गरजेचे आहे. सभागृहाने हा विषय पास करावा अशी मि सभागृहास विनंती करते.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 51** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत जुना नांदेड शहरातील ईदगाहला लागुन कब्रस्तान असल्याने व नदीवरील एक कोल्हापुरी बंधारा बांधण्यात आलेला असुन त्यामुळे नदीचा पाणी थांबविण्यात येत आहे. तसेच इदगाह समोरील एक दर्गाह असुन त्या ठिकाणी धार्मीक कार्यक्रम होत असतात त्या ठिकाणी नागरीकांना हातपाय धोण्यासाठी नदी जाण्यास अत्यंत त्रास होत आहे त्या करिता इदगाह समोरील नदीघाटाचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे तसेच ईदगाहच्या पाठीमागुन एक नाला वाहत असल्याने सदरील नाला हे हायवे व जुना पालाच्या जवळुन वाहत असल्याने भविष्यात भिंत कोसळण्याची दाट शक्यता असल्याने सदरचा नाला रोड पासुन 200 ते 300 मिटर सोडून आर.सी.सी. नाला नदीच्या कोपत्या पर्यंत बांधणे व ईदगाह समोरील नदी घाटाचे सुशोभिकरण करण्यासाठीचे हे काम नाविन्यपुर्व योजने अंतर्गत करण्यासाठी लागणा-या खर्चास निधी हे जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी प्राप्त करुन घेण्यासाठी शिफारस करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.06** **प्रस्ताव**

संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारे महाकारुणीक भगवान गौतम बुध्द यांची 2562वी जयंती शुध्द वैशाचा पौर्णिमेला सबंध जगात विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. तथागत बुध्दांच्या विचारांची गरज आज आपल्याला पावलोपावली पडत आहे मराठवाडयात तर भ. बुध्दांच्या विचाराचा प्रभाव असणारी अनेक राजघराणी होऊन गेली. त्यावेळचा प्रमुख धर्म म्हणून बौध्द धम्माला मान्यता होती. नांदेड (नंदिग्राम) पूज्य ब्राहम्ण बावरी बौध्द भंते यांनी आपल्या शिष्यांसह गोदावरी पात्रामार्गे नांदेड नगरीत आल्याचा इतिहास आहे. आपल्या देशात अनेक राज्यात भगवान बुध्दाच्या विशाल मूर्ती बसवलेल्या आहेत. आपल्या शेजारच्या तेलंगणा-आंध्रप्रदेशची राजधानी हैदराबाद येथे भगवान बुध्दांची विशाल मूर्ती (जुने हुसेन सागर) बुध्द सागरात उभे केलेले आहे यामळे पर्यटकांकडून महसुल तर मिळातोच, पण सर्वात महत्वाचे म्हणजे मूर्तीला पाहिल्यानंतर मनात करुणेचा भाव जागृत होतो याच धर्तीवर भीमघाट भागातील गोदावरी नदी पात्रात तथागत भ. गौतम बुध्दांची मूर्ती उभी करुन राष्ट्रीय स्मारक निर्माण करावे. नदीच्या किनारपटश्यात जागतिक दर्जाचे मृगवन गार्डन, विप्पशना केंद्र उभारुन जनतेला लाभ मिळवुन द्यावा. यातुन महापालिकेला मोठे उत्पन्न मिळेल हे स्मारक उभे करण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व पर्यटन विभाग यांच्याकडून आर्थीक सहाय उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- बापूराव गजभारे **अनुमोदक** :- सौ. ज्योती सुभाष रायबोले

**बापुराव गजभारे** महाकारुणीक तथागत गौतम बुध्द यांची मुर्ती गोदावरी नदीच्या पात्रात बसविण्यास नांदेड नगरीची शान वाढेल. 32 मीटरची मुर्ती नदीच्या पात्रात बसुन नांदेडच्या वैभवात भर टाकावी. श्री गुरु गोविंदसिंघाचे नांव जगभरात पसरल्यामुळे नांदेड शहर हे नांव लौकीकास आलेले आहे. ही मुर्ती जर बसविली तर आपल्या शहराचा लौकीकात भर पडणारच आहे. ही मुर्ती बसविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे यात सहाय्य घेण्यात यावे तसेच मनपाने ही या सहाय्य करावे. म्हणुन मी सभागृहास विनंती करतो की, हा विषय सर्वानुमते पास करावा.

**सभागृह नेता** कोणतीही मुर्ती नदीच्या पात्रात बसविण्यासाठी एमजेपीची मान्यता घेणे गरजेचे आहे. नदी पात्र हे आपल्या मालकीचे नाही. हा विषय सभागृहाने पास केला त्या त्या समाजातुन प्रशासनावर ही कार्यवाही पुर्ण करण्यासाठी दबाव वाढत असते. म्हणुन या ठिकाणी 15 नगरसेवक आहेत त्यांची एक समिती गठीत करण्यात यावी व इतरही त्यांच्या समाजाचे लोकांचा या समितीमध्ये समावेश करण्यात यावा.नदीपात्रात बसविण्यास एमजीपीची एनओसी आवश्यक आहे त्यांची परवानगीने आपण राज्य शासनाकडे प्रस्ताव शिफारशीसह पाठविण्यात येईल. ही मुर्ती बसविण्यासाठी जागा कोणती असावी याकरीता समितीने निर्णय घ्यावा.

**बापुराव गजभारे** भिमघाटाच्या बाजूला आपली जागा आहे त्या ठिकाणी सांस्कृतीक सभागृह व मुर्ती बसविण्यात यावी. याकरीता समाज कल्याण विभागास प्रस्ताव तात्काळ पाठवावा. समिती गठीत करण्यात यावी. या समितीमध्ये मा.महापौर यांच्या अध्यक्षते खाली, मा.उपमहापौर, मा. सभागृहनेता, श्री आनंद चव्हाण, श्री अ. सत्तार अ. गफुर, श्री बापुराव गजभारे, श्री तेहरा अमितसिंह, सौ. राबयेले ज्योती सुभाष, सौ. धबाले दिक्षा कपिल, सौ. गायकवाड चित्रा सिध्दार्थ, सौ. गूपिले बेबी जनार्धन यांची एक समिती गठीत करण्यता यावी सदरील समितीने तथागत गौतम बुध्दा यांची मुर्ती शहरात कोठे बसविण्यासाठी जागा निश्चित करुन तसा अहवाल महासभे समोर ठेवून अंतीम निर्णय घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**उमेश चव्हाण** तथागताची मुर्ती सन 2007-2008 मध्ये बसविण्याचा विषय पास झाला होता परंतू काही अपरीहार्य कारणामुळे हा प्रस्ताव पुर्णत्वास नेवू शकलो नाही. तथागत बुध्दाची मुर्ती बसविण्यात यावी यामुळे शहराच्या सौदर्यात भर पडेल. सभागृहाने हा विषय पास करावा अशी मी विनंती करतो.

**महापौर** तथागत गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्यासाठी एक समिती गठीत करण्यात येते या समितीत 15 सदस्य व इतरही समाजाचे प्रतिष्ठीत लोकांचा समावेश करण्यात येते. आयुक्त हे सुध्दा समितीत राहतील, सदर समितीचे अध्यक्ष महापौर हे राहतील.

**सभागृह नेता** नगरसेवक स्वेच्छा निधी ही पाच लक्षा वरुन 10 लक्ष करण्यात यावी. या 10 लक्षाचे कामाचे निविदा प्रसीध्द करावे.

**बापुराव गजभारे** भगवान गौतम बुध्दांची मूर्ती गोदावरी नदी पात्रात न उभारता भिमघाट येथील परिसरात उभारण्यास मान्यता देण्यात यावी

**महापौर** सुचक श्री बापुराव गजभारे यांनी भगवान गौतम बुध्दांची मूर्ती गोदावरी नदी पात्रात न उभारता शहर जागा निश्चित करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात येते सदरील समितीमध्ये मा.महापौर यांच्या अध्यक्षते खाली, मा.उपमहापौर, मा. सभागृहनेता, श्री आनंद चव्हाण, श्री अ. सत्तार अ. गफुर, श्री बापुराव गजभारे, श्री तेहरा अमितसिंह, सौ. राबयेले ज्योती सुभाष, सौ. धबाले दिक्षा

कपिल, सौ. गायकवाड चित्रा सिध्दार्थ, सौ. गूपिले बेबी जनार्धन यांची एक समिती गठीत करण्यता यावी सदरील समितीने तथागत गौतम बुध्दा यांची मुर्ती शहरात कोठे बसविण्यासाठी जागा निश्चित करुन तसा समितीचा अंतीम अहवाल महासभे समोर ठेवून अंतीम निर्णय घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**ठराव क्रं. 52** **ठराव**

संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारे महाकारुणीक भगवान गौतम बुध्द यांची 2562वी जयंती शुध्द वैशाचा पौर्णिमेला सबंध जगात विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. तथागत बुध्दांच्या विचारांची गरज आज आपल्याला पावलोपावली पडत आहे मराठवाडयात तर भ. बुध्दांच्या विचाराचा प्रभाव असणारी अनेक राजघराणी होऊन गेली. त्यावेळचा प्रमुख धर्म म्हणून बौध्द धम्माला मान्यता होती. नांदेड (नंदिग्राम) पूज्य ब्राहम्ण बावरी बौध्द भंते यांनी आपल्या शिष्यांसह गोदावरी पात्रामार्गे नांदेड नगरीत आल्याचा इतिहास आहे. आपल्या देशात अनेक राज्यात भगवान बुध्दाच्या विशाल मूर्ती बसवलेल्या आहेत. आपल्या शेजारच्या तेलंगणा-आंध्रप्रदेशची राजधानी हैदराबाद येथे भगवान बुध्दांची विशाल मूर्ती (जुने हुसेन सागर) बुध्द सागरात उभे केलेले आहे यामुळे पर्यटकांकडून महसुल तर मिळातोच, पण सर्वात महत्वाचे म्हणजे मूर्तीला पाहिल्यानंतर मनात करुणेचा भाव जागृत होतो याच धर्तीवर **भीमघाट परिसरात तथागत भ. गौतम बुध्दांची मूर्ती उभारण्यासाठी** एक समिती गठीत करण्यात येत असुन सदरील समितीमध्ये मा.महापौर यांच्या अध्यक्षते खाली, मा.उपमहापौर, मा. सभागृहनेता, श्री आनंद चव्हाण, श्री अ. सत्तार अ. गफुर, श्री तेहरा अमितसिंह, श्री बापुराव गजभारे, सौ. राबयेले ज्योती सुभाष, सौ. धबाले दिक्षा कपिल, सौ. गायकवाड चित्रा सिध्दार्थ, सौ. गूपिले बेबी जनार्धन यांची एक समिती गठीत करण्यता यावी सदरील समितीने तथागत गौतम बुध्दा यांची मुर्ती शहरात कोठे बसविण्यासाठी जागा निश्चित करुन तसा अहवाल महासभे समोर ठेवून अंतीम निर्णय घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रं.07** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, आस्थापनेवर मुख्य लेखा परिक्षक या अभिमानाचे पद मंजुर असून शासन निर्णय व सेवा प्रवेशानुसार सदरील पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावयाची मान्यता आहे.त्यानुसार शासनाच्या वित्त विभागाच्या लेखा व कोषागारे सेवा अंतर्गत उपसंचालक संवर्गातील श्री रावसाहेब तातेराव कोलगणे हे या महानगरपालिकेत दि.14 ऑगस्ट 2014 रोजी प्रतिनियुक्ती आदेशानुसार रुजू झाले होते. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-याच्या बदल्यांचे विनीयमन व शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनीयम 2005 मधील तरतुदी विचार घेता संबंधीत बदलीपात्र आहे. परंतू या महानगरपालिकेतील श्री रा.ता.कोलगणे यांनी दिलेली अत्यंत समाधानकारक सेवा व पार पाडलेली कर्तव्य/कामे,तसेच त्यांच्या आईच्या वृध्दपकाळ व औषाधोपचार, मोठया मुलांचे 12 वीचे नांदेड महाविद्यालयीन शिक्षणासाठी संबंधिताचे नांदेड येथे 2018-19 या कालावधीत राहणे आवश्यक असल्याने केलेली विनंती विचारात घेता त्यांना विशेष बाब म्हणून या 2018-19 या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास व प्रस्तावाच्या अनुषंगाने नगरविकास विभाग व वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्याची उचित कार्यवाही मा.आयुक्त यांनी करण्यात यावी.

**सुचकः-** आनंद चव्हाण, सय्यद शेर अली **अनुमोदकः-** स.विरेंद्रसिंघ गाडीवाले

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

श्री रावसाहेब तातेराव कोलगणे, महाराष्ट्र वित्त व सेवा गट (अ) सध्या मुख्य लेखापरिक्षक नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने दिनांक 14.08.2014 रोजी नियुक्ती झालेली आहेत.

शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार ते बदलीस पात्र आहेत.

त्यामुळे त्यांच्या बदली बाबत त्यांचे पैतृक खात्याकडून निर्णय अपेक्षीत आहे.

**सभागृहनेता** श्री रावसाहेब तातेराव कोलगणे, महाराष्ट्र वित्त व सेवा गट (अ) सध्या मुख्य लेखापरिक्षक नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने दिनांक 14.08.2014 रोजी नियुक्त झालेले आहेत. तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा केंद्र शासनाने अमृत योजने अंतर्गत समावेश केलेला असून त्या योजनपे मधील तरोडा, सिडको या व इतर भागातील मल निस्सारण व पाणी पुरवठा विकासाची रुपये 150.00 कोटीची कामे प्रगती पथावर आहेत. शिवाय महापालिकेच्या स्टेडीयमच्या कामासाठी केंद्र शासनाने रुपये 42.00 कोटीचा व घनकचरा व्यवस्थापनासाठी रुपये 28.00 कोटीचा निधी वितरीत केलेला आहे या सर्व योजना व इतर शासकीय योजनेचया कामाचे लेखा परिक्षण करणे तसेच महानगरपालिकेच्या सर्व कामांचे (Pre and Post Audit) त्यांच्या मार्फतच करुन घेण्यातच येते. त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीतील मागील लेखा परिक्षणाचे काम त्यांनी यशस्वीपणे सांभाळलेले आहेत. सर्व कामे त्यांना ज्ञात झालेली आहेत. यामुळे त्यांनी केलेली विनंती तसेच त्यांच्या सेवेची या महापालिकेला नितांत आवश्यकता आहे. करिता त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत एक वर्षासाठी विशेष बाब म्हणुन मुदतवाढ करण्यासाठी शासनाकडील संबंधीत विभागास शिफारस करण्यात यावी.

**महापौर** सभागृहनेता यांनी वरील प्रमाणे दुरुस्त प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 53** **ठराव**

श्री रावसाहेब तातेराव कोलगणे, महाराष्ट्र वित्त व सेवा गट (अ) सध्या मुख्य लेखापरिक्षक नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने दिनांक 14.08.2014 रोजी नियुक्त झालेले आहेत.

शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार ते बदलीस पात्र आहेत त्यांना त्यांच्या आईचा वृध्दापकाळ व औषधोपचार व मोठया मुलाचे इयत्ता 12वी चे नांदेड येथील महाविद्यालय शैक्षणिक वर्षाकरिता त्यांना नांदेड येथे राहणे आवश्यक असल्याचे विनंती अर्ज सादर केला आहे.

ही बाब विचारात घेता तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा केंद्र शासनाने अमृत योजने अंतर्गत समावेश केलेला असून त्या योजनपे मधील तरोडा, सिडको या व इतर भागातील मल निस्सारण व पाणी पुरवठा विकासाची रुपये 150.00 कोटीची कामे प्रगती पथावर आहेत. शिवाय महापालिकेच्या स्टेडीयमच्या कामासाठी केंद्र शासनाने रुपये 42.00 कोटीचा व घनकचरा व्यवस्थापनासाठी रुपये 28.00 कोटीचा निधी वितरीत केलेला आहे या सर्व योजना व इतर शासकीय योजनेचया कामाचे लेखा परिक्षण करणे तसेच महानगरपालिकेच्या सर्व कामांचे (Pre and Post Audit) त्यांच्या मार्फतच करुन घेण्यातच येते. त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीतील मागील लेखा परिक्षणाचे काम त्यांनी यशस्वीपणे सांभाळलेले आहेत. सर्व कामे त्यांना ज्ञात झालेली आहेत. यामुळे त्यांनी केलेली विनंती तसेच त्यांच्या सेवेची या महापालिकेला नितांत आवश्यकता आहे.

करिता त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत एक वर्षासाठी विशेष बाब म्हणुन मुदतवाढ करण्यासाठी शासनाकडील संबंधीत विभागास शिफारस करण्याची ही सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.08** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण 20 प्रभाग असून शहराची दैनंदीन स्वच्छतेच्या कामावर नियंत्रण ठेवण्याचे काम हे स्वच्छता निरीक्षकांचे आहे, महानगरपालिकेत स्वच्छता निरीक्षकाचे काम करीता असलेल्या केवळ स्वच्छता निरीक्षक पदावरील 11 कर्मचा-यांकडेच एस.आय.डिप्लोमा ही अर्हता आहे, ऊर्वरीत काही कर्मचारी हा डिप्लोमा धारण करीता नाहीत, ज्यामुळे अश्या स्वच्छता निरीक्षकांकडुन दैनंदिन स्वच्छतेच्या कामावर नियंत्रण व्यवस्थितपणे होत नाही, ज्यामुळे ब-याच भागामध्ये स्वच्छतेच्या समस्या उदभवत आहेत, त्यामुळे अशा प्रभारी स्वच्छता निरीक्षक यांना महानगरपालिकेकडून संबंधित डिप्लोमाचे प्रशिक्षण देण्यास किंवा त्यांचंऐवजी जे कर्मचारी डिप्लोमा धारण करीत आहेत,त्यांना स्वच्छता निरीक्षकाचे काम देण्याबाबत सर्वसाधारण सभेसमोर निर्णयास्तव सादर

**सुचक:**- मोहम्मद साबेर चाऊस **अनुमोदक:**-अ.हफीज अ.करीम

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

नावाशमनपा हद्दी मध्ये एकुण 20 प्रभाग असुन शहराची दैनंदिन स्वच्छतेच्या कामावर नियंत्रण ठेवण्याचे काम स्वच्छता निरीक्षका मार्फत केल्या जाते. मनपा आस्थापनेवर स्वच्छता निरीक्षकांची 14 पद मंजुर असून सध्या 12 स्वच्छता निरीक्षक कार्यरत आहेत. 02 पदे रिक्त आहेत सध्या स्थितीत शहराचा विकास, वाढती लोकसंख्या विचारात घेता 10 कर्मचा-यांकडून प्रभारी स्वच्छता निरीक्षकांचे कामे करुन घेण्यात येत आहेत. बिंदु नामावली प्रस्तावित असून मावक औरंगाबाद यांच्या कडून तपासणी झाल्यानंतर सेवा जेष्ठतेनुसार महानगरपालिकेतील जे कर्मचारी स्वच्छता निरीक्षक या पदाची शैक्षणिक अर्हता धारण करतील अशा कर्मचा-यांना पदोन्नती देणे बाबत कार्यवही प्रस्तावित करण्यात येईल.

**महापौर** ज्या कर्मचा-यांकडून स्वच्छता निरीक्षकांची शैक्षणिक अर्हता आहे त्यांना पदोन्नती देवुन अथवा जे कर्मचारी संबंधीत डिप्लोमाचे प्रशिक्षण घेण्यास तयार आहे अशा कर्मचा-यांना प्रशिक्षण देवुन त्यांच्याकडून स्वच्छता निरीक्षकांचे कामे करुन घेण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 54** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण 20 प्रभाग असून शहराची दैनंदीन स्वच्छतेच्या कामावर नियंत्रण ठेवण्याचे काम हे स्वच्छता निरीक्षकांचे आहे, महानगरपालिकेत स्वच्छता निरीक्षकाचे काम करीता असलेल्या केवळ स्वच्छता निरीक्षक पदावरील 11 कर्मचा-यांकडेच एस.आय.डिप्लोमा ही अर्हता आहे, ऊर्वरीत काही कर्मचारी हा डिप्लोमा धारण करीता नाहीत, ज्यामुळे अश्या स्वच्छता निरीक्षकांकडुन दैनंदिन स्वच्छतेच्या कामावर नियंत्रण व्यवस्थितपणे होत नाही, ज्यामुळे ब-याच भागामध्ये स्वच्छतेच्या समस्या उदभवत आहेत, त्यामुळे अशा प्रभारी स्वच्छता निरीक्षक यांना महानगरपालिकेकडून संबंधित डिप्लोमाचे प्रशिक्षण देण्यास किंवा त्यांचे ऐवजी जे कर्मचारी डिप्लोमा धारण करीत आहेत, अशा कर्मचा-यांकडून स्वच्छता निरीक्षकाचे काम देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.09** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या ड्रेनेज विभागाकडे ड्रेनेजची स्वच्छता करणेसाठी गल्फर मशीन व जेटींग मशीन उपलब्ध असून सदरचे वाहन हे मोठया स्वरुपाचे असल्याने ते गल्फर मशीन शहरातील मुख्य रस्ते व रुंद भागातील ड्रेनेजची स्वच्छता करण्यात येते परंतू शहरातील बरेचसे भाग हे अरुंद असून दाट वस्तीचे भाग आहेत. अशा भागांमध्ये मोठे वाहन घेवुन जाता येत नसल्याने ड्रेनेज स्वच्छतेचे काम करता येत नाही.तरी 14 व्या वित्त आयोगाच्या निधीतून महानगरपालिकेच्या झोननिहाय प्रत्येकी 1 अशी छोटया स्वरुपाचे गल्फर व जेटींग खरेदी करणेसाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचकः**- ज्योत्सना राजु गोडबोले **अनुमोदकः**-दुष्यंत सोनाळे

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 55** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या ड्रेनेज विभागाकडे ड्रेनेजची स्वच्छता करणेसाठी गल्फर मशीन व जेटींग मशीन उपलब्ध असून सदरचे वाहन हे मोठया स्वरुपाचे असल्याने ते गल्फर मशीन शहरातील मुख्य रस्ते व रुंद भागातील ड्रेनेजची स्वच्छता करण्यात येते परंतू शहरातील बरेचसे भाग हे अरुंद असून दाट वस्तीचे भाग आहेत.अशा भागांमध्ये मोठे वाहन घेवुन जाता येत नसल्याने ड्रेनेज स्वच्छतेचे काम करता येत नाही.तरी 14 व्या वित्त आयोगाच्या निधीतून महानगरपालिकेच्या झोननिहाय प्रत्येकी 1 अशी छोटया स्वरुपाचे गल्फर व जेटींग खरेदी करणेसाठी ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.10** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेत कार्यरत असलेले कर्मचारी श्री ओंकारेश्वर अरविंद स्वामी लिपीक हे मुळचे लातुर जिल्हाचे रहिवाशी असून त्यांचे संपुर्ण कुटुंब हे लातुर येथे वास्तव्यास असुन त्यांचे वृध्द आई-वडीलांची काळजी घेण्यास कोणी नसल्यामुळे महाराष्ट्र नगर पालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम-2008 मधील 6 ) अन्वये एका महानगरपालिकेतुन दुस-या महानगरपालिकेत बदलीने नियूक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनीयमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकेतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील अशा अटी शर्तीवर खालील बाबींच्या अधीन राहुन बदलीने नियूक्ती देता येईल.

अ) पदोन्नतीचे भ्ररण्यात येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही.फक्त नामनिर्देशने नियुक्ती करीता राखुन ठेवण्यात आलेल्या रिक्त पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

ब) अशी नियूक्ती झाल्यानंतर त्या पदधारकाची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ ( Zero Seniority ) राहील.

ज्या दिनांकास संबंधित हे लातुर महापालिकेत रुजु होतील तो दिनांक त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ राहील व संबंधिताचे व संरक्षीत करुन सेवा समायोजीत करुन त्यांचे नविन परिभाषीत अंशदायी निवृत्ती वेतन (डी.सी.पी.एस) कार्यवाही ही नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेतील त्यांच्या रुजु दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल या अटिवर त्यांची सेवा वर्ग करण्यास हरकत नाही.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधीन राहुन श्री ओंकारेश्वर अरविंद स्वामी, लिपीक यांना लातुर महापालिकेत सामावुन घेणेसाठी पत्रव्यवहार करुन पुढील वैधानिक कार्यवाही प्रशासनाने करावी सदरचा ठराव मनपा सर्वसाधारण सभे समोर ठेवुन कायम करण्यात यावा.

**सुचकः**- पवळे उमेशराव देवराव, मो.साबेर चाऊस, **अनुमोदकः**- अडॅ.महेश कनकदंडे, किशोर स्वामी

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (सेवाभर्ती व सेवांचे वर्गीकरण नियम 2008 मधील (6) अन्वये एका महानगरपालिकेतुन दुस-या महानगरपालिकेत बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकेतील निसयुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील अशा अटी व शर्तीवर अधिन राहुन दबलीने नियुक्ती देता येईल.

1. पदोन्नतीने भरण्यात येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. पक्त नामनिर्देशनाने नियक्ती करिता राखून ठेवण्यात आलेल्या रिकत पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.
2. अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकांची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (झिरो सिनियारीटी) राहील.

तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं. एसआरव्ही-2010/प्रक्र210 /10/12, दिनांक 03.06.2011 च्या शासन निर्णयात अ.क्रं. 03 नुसार गट क मधील कर्मचा-यांची विनंतीवरुन / संवर्गबाहय बदली करण्यासाठी खालील अटी नमुद आहेत.

3. विनंतीवरुन, संवर्गबाहय बदली केवळ त्याच पदावर अथवा समकक्ष पदावर करता येईल. अपवादात्मक परिस्थतीत कनिष्ठ ( वेतनश्रेणी) वेतनबॅन्ड व ग्रेड पे मधील नपदावर बदली करता येईल. मात्र ज्या पदांकरिता विशिष्ठ तांत्रिक व अन्य अर्हता विहित केली असेल व स्वतंत्र निवड प्रक्रिया अवलंबण्यात येत असेल अशा संवर्गाबाहय पदावर बदली अनुज्ञेय होणार नाही.

4. संबंधीत कर्मचा-यांची नियुक्ती नियमीत असावी व त्याला / तिला स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले असावे. संबंधीत कर्मचा-यांची किमान 05 वर्ष सेवा पूर्ण झाली असावी अपवादात्मक परिस्थतीत हा कालावधी 02 वर्ष इतका शिथील करता येईल म्हणजेच किमान 03 वर्ष सेवा पूर्ण झालेली असल्यास आपवादात्मक परिस्थितीत विनंती विचारात घेता येईल.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री ओमकारेशवर अरविंद स्वामी लिपीक (इमाव) यांची नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील सेवा वर्ग करण्यास ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. तथापि सदर प्रकरणी शासनाच्या विहीत नियमानुसार संपूर्ण वैधानिक कार्यवाही प्रथमत: लातुर महानगरपालिकेकडून होणे आवश्यक आहे.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 56** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेत कार्यरत असलेले कर्मचारी श्री ओंकारेश्वर अरविंद स्वामी लिपीक हे मुळचे लातुर जिल्हाचे रहिवाशी असून त्यांचे संपुर्ण कुटुंब हे लातुर येथे वास्तव्यास असुन त्यांचे वृध्द आई-वडीलांची काळजी घेण्यास कोणी नसल्यामुळे महाराष्ट्र नगर पालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण नियम-2008 मधील 6) अन्वये एका महानगरपालिकेतुन दुस-या महानगरपालिकेत बदलीने नियूक्तीसाठी अर्ज केल्यास अधिनीयमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकेतील नियुक्ती प्राधिका-यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील अशा अटी शर्तीवर खालील बाबींच्या अधीन राहुन बदलीने नियूक्ती देता येईल.

अ) पदोन्नतीचे भ्ररण्यात येणा-या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही.फक्त नामनिर्देशने नियुक्ती करीता राखुन ठेवण्यात आलेल्या रिक्त पदावर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

ब) अशी नियूक्ती झाल्यानंतर त्या पदधारकाची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority ) राहील.

ज्या दिनांकास संबंधित हे लातुर महापालिकेत रुजु होतील तो दिनांक त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ राहील व संबंधिताचे व संरक्षीत करुन सेवा समायोजीत करुन त्यांचे नविन परिभाषीत अंशदायी निवृत्ती वेतन (डी.सी.पी.एस) कार्यवाही ही नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेतील त्यांच्या रुजु दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल या अटिवर त्यांची सेवा वर्ग करण्यास हरकत नाही.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधीन राहुन श्री ओंकारेश्वर अरविंद स्वामी,लिपीक यांना लातुर महापालिकेत सामावुन घेणेसाठी पत्रव्यवहार करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.11** **प्रस्ताव**

श्रीमती सुमैय्या सुलताना मोहम्मद सगीर हया बृहन्मुबई महानगरपालिकेच्या श्रमिक विदयापीठ व्होकेशनल म्युनिसीपल ऊर्दू स्कुल नं.1 धारावी ( जी-नॉर्थ वॉर्ड,शिक्षण विभाग ) येथे प्राथमिक विदयानयात शिक्षीका या पदावर मागील 7 वर्षापासुन कार्यरत आहेत.त्यांचे पती, सासु-सासरे व सर्व कुटूंब हे नांदेड येथील असून त्यांच्या सासु हया वृध्द असून मागील ब-याच वर्षापासून हृदयविकाराने त्रस्त आहेत व सास-यानांही मानसिक आजार असल्याने त्यांची देखभाल करणेसाठी संबंधितांना नांदेड येथे राहणे आवश्यक आहे.त्यामुळे श्रीमती सुमैय्या सुलताना मोहम्मद सगीर, प्राथमिक शिक्षीका यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक विदयापीठ व्होकेशन म्युनिसीपल ऊर्दू स्कूल नं.1 धारावी ( जी-नॉर्थ,शिक्षण विभाग )येथुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेच्या रिक्त असलेल्या पदावर सेवा समाविष्ठ करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानूमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक:-** मोहम्मद साबेर चाऊस **अनुमोदक:-**अ.हफीज अ.करीम

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

श्रीमती सुमैय्या सुलताना मोहम्मद सगीर, सहशिक्षीका, बृहमुंबई महानगरपालिका बृहमुंबई यांनी त्यांच्या कौटूंबिक कारणास्व नावाशमनपा नांदेड येथे सेवा वर्ग करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत स. सदस्य, मनपा नांदेड यांनी मनपा सर्वसाधारण सभेत ठेवलेला आहे परंतु संबंधीत सह शिक्षीका हया बृहमुंबई महानगरपालिकेतील कार्यरत सहशिक्षक असून बृहमुंबई महानगरपालिकचे नियमावली ही अन्य महापालिकेपेक्षा वेगळी असल्यामुळे संबंधीतांची एकतर्फी बदलीने सेवा वर्ग करता येणार नाही.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 57** **ठराव**

श्रीमती सुमैय्या सुलताना मोहम्मद सगीर हया बृहन्मुबई महानगरपालिकेच्या श्रमिक विदयापीठ व्होकेशनल म्युनिसीपल ऊर्दू स्कुल नं.1 धारावी ( जी-नॉर्थ वॉर्ड,शिक्षण विभाग ) येथे प्राथमिक विदयानयात शिक्षीका या पदावर मागील 7 वर्षापासुन कार्यरत आहेत.त्यांचे पती, सासु-सासरे व सर्व कुटूंब हे नांदेड येथील असून त्यांच्या सासु हया वृध्द असून मागील ब-याच वर्षापासून हृदयविकाराने त्रस्त आहेत व सास-यानांही मानसिक आजार असल्याने त्यांची देखभाल करणेसाठी संबंधितांना नांदेड येथे राहणे आवश्यक आहे.त्यामुळे श्रीमती सुमैय्या सुलताना मोहम्मद सगीर, प्राथमिक शिक्षीका यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या श्रमिक विदयापीठ व्होकेशन म्युनिसीपल ऊर्दू स्कूल नं.1 धारावी ( जी-नॉर्थ,शिक्षण विभाग )येथुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेच्या रिक्त असलेल्या पदावर सेवा समाविष्ठ करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानूमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.12** **प्रस्ताव**

सय्यदा आलीया बेगम पि.सय्यद आरीफोदीन हया भिवंडी महानगरपालिकेत उपशिक्षीका पदावर कार्यरत आहेत.ते मुळचे नांदेड येथील रहीवाशी असून त्यांच्या आई वयावृध्द असून थायरॉईड, मधुमेह व उच्च रक्तदाबाच्या आजाराने नेहमी त्रस्त आहे.त्यांची वेळेवर सेवा व उपचार करणेकरीता इतर कोणीही नाही. त्यामुळे त्यांना नांदेड महापालिकेत बदली करणे अनिवार्य आहे.

त्यामुळे सय्यदा आलीया बेगम पि.सय्यद आरीफोद्दीन यांची भिवंडी जि.ठाणे महानगरपालिकेतून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत बदली करणे करीता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक:**- आयेशा बेगम शेख असलम **अनुमोदक:**-फारुख हुसेन बदवेल

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 58** **ठराव**

सय्यदा आलीया बेगम पि.सय्यद आरीफोदीन हया भिवंडी महानगरपालिकेत उपशिक्षीका पदावर कार्यरत आहेत.ते मुळचे नांदेड येथील रहीवाशी असून त्यांच्या आई वयावृध्द असून थायरॉईड, मधुमेह व उच्च रक्तदाबाच्या आजाराने नेहमी त्रस्त आहे.त्यांची वेळेवर सेवा व उपचार करणेकरीता इतर कोणीही नाही. त्यामुळे त्यांना नांदेड महापालिकेत बदली करणे अनिवार्य आहे.

त्यामुळे सय्यदा आलीया बेगम पि.सय्यद आरीफोद्दीन यांची भिवंडी जि.ठाणे महानगरपालिकेतून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत बदली करणे करीता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**<u>विशेष बाब म्हणुन आयत्या वेळीचे विषय</u>**

**महापौर** विशेष बाब म्हणुन खालील प्रस्तावास आयत्या वेळी घेण्यात आलेले असुन त्यास मान्यता देण्यात येते.

**विषय -** **प्रस्ताव**

तथागत गौतम बुध्द यांच्या जयंती निमित्त गेल्या 10 व वर्षापासुन बुध्द प्रभात हा सांस्कृतिक कार्यक्रमाचे एकनिष्ठ प्रतिष्ठान मार्फत आयोजन केले जाते. या कार्यक्रमासाठी महानगरपालिका रु. 50,000/- आर्थिक मदत करते. त्यास प्रतीवर्षी महासभेची मान्यता घ्यावी लागते.

ही मान्यता प्रतीवर्षी घेण्याऐवजी त्यास कायमस्वरुपी मान्यता देणेकरीता ही सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम कायण्यात येते

**सुचक** :- सौ.गितांजली हाटकर **अनुमोदक** :- विनय पाटील, गोडबोले ज्योत्सना राजु

**<u>प्रशासकीय टिप्पणी</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभे समोर तथागत गौतम बुध्द यांच्या जयंती निमित्त गेल्या 10 वर्षापासून बुध्द प्रभात हा सांस्कृतीक कार्यक्रमाचे एकनिष्ठ प्रतिष्ठान मार्फत आयोजीत केले जाते.या कार्यक्रमासाठी महानगरपालिका रु. 50,000/- आर्थीक मदत करते त्यास प्रतिवर्षी महासभेची मान्यता घ्यावी लागते.ही मान्यता प्रतिवर्षी घेण्याऐवजी त्यास कायमस्वरूपी मान्यता देणे करीता असा प्रस्ताव स.सदस्यांनी सादर केला आहे.

तथापि, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 66 (21), (22), (25), व (41) अन्वये सांस्कृतीक कार्यक्रम / क्रिडा/ महिला बालकल्याण व विविध संस्थाना देण्यात येणा-या अनुदानाची नियमावली मनपाने तयार केलेली आहे. ज्यमध्ये अनुदान वाटपाची कार्यपध्दती कलम 3 मध्ये नमुद करण्यात आली आहे.सदर कार्यपध्दत खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे

**<u>नियम:5-</u>** कोणत्याही विविध पंजीकृत अथवा नोंदणीकृत शैक्षणिक, सांस्कृतीक, सामाजीक, साहित्य, कला, क्रिडा व नाटय क्षेत्रातील संस्थेस किंवा त्या संस्थेच्या संलग्न तीन वर्षातुन एकवेळेस अनुदान देण्यात येईल असे स्प्ष्ट नमुद केले आहे.

**<u>नियम:6-</u>** पंजीकृत अथवा नोदणीकृत शैक्षणिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, सामाजीक, साहित्य, कला, क्रिडा व नाटय क्षेत्रातील संस्थेनी अंशदानासाठी अर्ज करते वेळेस विशिष्ठ प्रपत्रात अर्ज केला पाहिजे.संस्थेच्या अर्जासोबत संस्थेच्या वार्षीक अहवालाची प्रत,लेखापरीक्षणाची प्रत, नोंदणीकृत प्रमाणपत्र,तसेच चार्टड अकाँऊटंट यांचे लेखा परिक्षणाची प्रत इत्यादी बाबी जोडणे आवश्यक राहील त्याशिवाय अशंदान देण्यात येणार नाही.असे नमुद केले आहे.

**<u>नियम:8-</u>** खाजगी संस्थेने वाचनालय, व्यायम शाळा व इतर क्रिडा क्षत्रातील संस्था तसेच इतर पंजीकृत संस्था यांचे पंजीकरण करुन पाच वर्षाचा कालावधी झालेला असला पाहिजेव महानगरपालिका हदीत कमीत कमी पाच पंजीकरण करुन पाच वर्षाचा कालावधी झालेला असला पाहिजे व महानगरपालिका हदीत कमीत कमी पाच वर्षाचे कार्य असले पाहिजे तरच अनुदान देण्यात येईल.

**<u>नियम:9-</u>** धार्मीक /राजकीय संस्थाना अंशदान दिले जाणार नाही.तसेच धार्मीक राजकीय उपक्रमानांही अंशदान दिले जाणार नाही. तसेच धार्मीक राजकीय उपक्रमानाही अंशदान दिले जाणार नाही व अंशदान मिळणे हा कोणाचाही हक्क राहणार नाही तो महानगरपालिकेच्या उपलब्ध निधीवर उपलब्ध निधीवर अवलंबून राहील असे नमुद आहे.

सदर नियमावलीस नांवाशमनपा सर्व साधारण सभा ठराव क्र.130 दिनांक 17.10.2006 अन्वये मान्यता मिळालेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. नावाशमनपा-1300/1230/प्र.क्र30/05/नवि-24 दिनांक 10/12/2007 च्या शासन निर्णया अन्वये सदर नियमावलीस मान्यता प्रदान केली आहे.

करीता शासन मान्य नियमावलीतील अनुदान वाटपाची कार्यपध्दत कलम 3 नियम क्र 05 नुसार कोणत्याही विविध पंजीकृत अथवा नोंदणीकृत शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्य, कला, क्रिडा व नाटय क्षेत्रातील संस्थेस किंवा त्या संस्थेच्या संलग्न तीन वर्षातुन एकवेळेस अनुदान देण्यास येईल अशी तरतुद आहे.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 59** **ठराव**

तथागत गौतम बुध्द यांच्या जयंती निमित्त गेल्या 10 व वर्षापासुन बुध्द प्रभात हा सांस्कृतिक कार्यक्रमाचे एकनिष्ठ प्रतिष्ठान मार्फत आयोजन केले जाते. या कार्यक्रमासाठी महानगरपालिका रु. 50,000/- आर्थिक मदत करते. त्यास प्रतीवर्षी महासभेची मान्यता घ्यावी लागते.

ही मान्यता प्रतीवर्षी घेण्याऐवजी त्यास कायमस्वरुपी मान्यता देणेकरीता ही सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम कायण्यात येते. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येईल=

**शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.**

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| **नावाशमनपा नांदेड** | **नावाशमनपा नांदेड** |